
आईने विचारलं, " काय रे, स्टॅलीनला पाहीलंस ? "
" हो तर. " मी निरुत्साहाने उत्तर दिलं. आम्ही ग्लासं भिडवली.
मी आईजवळ खोटं बोललो नव्हतो.
मी जे पाहिलं होतं तेच स्टॅलीनचं खरं दर्शन होतं.

—आत्मकथा—एका कवीची




# माणूस

शनिवार
१५ जुलै १९७२
पन्नास पैसे

माणूस
शनिवार
१५ जुलै १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : सातवा

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार....

२ जुलै १९७२

□ सांगली-कोल्हापूर या एस. टी. प्रवासात चालू आठवड्याचा 'माणूस' समग्र वाचून काढला. सर्वच अंक वाचनीय वाटला. परिवर्ध्यातील पेटता संघर्ष आणि रचनात्मक धडपडीचा आलेख विशेष. रत्नाकर मतकरींच्या सहा एकांकिकांचे परिक्षण करताना निशिकांत मिरजकर विलक्षण भारावून गेल्यासारखे वाटतात, तर 'शतपावली'-तील रवींद्र पिंगे यांची शैली सहजतेच्या सीमारेषा ओलांडून गेल्यासारखी भासली. 'ना तुला ना मला ..'च्या लेखिका नलिनी अंबाडे यांची राजगोपालाचारींच्या वयाबाबत थोडी गफलत झाली आहे. आज ९३ वा वाढदिवस साजरा झाला असल्याने १९४३ साली राजगोपालाचारी यांचे वय ६० कसे? साठीचा म्हातारा हा वाक्प्रचार सत्तरीकडे वाटचाल करणाऱ्या व्यक्तीबाबत वापरीत नसतात.

कविता विभागाची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली.

**श्रीरंग जोशी, सांगली**

३ जुलै १९७२

□ मुद्दाम पत्र लिहिण्याचे कारण की, अरुण साधू यांची 'फिडेल, चे आणि क्रांती' ही लेखमाला मी पहिल्या लेखापासून वाचत आहे व ती मला अतिशय आवडते. मला क्यूबन क्रांतीच्या इतिहासाची फक्त वर्तमानपत्रीय माहिती आहे. पण साधू यांच्या लेखमालेतून त्या क्रांतीच्या जन्माची व तिच्या विविध अंगांची अतिशय सखोल माहिती होत आहे. त्याकरता आपणास व अरुण साधू यांना धन्यवाद.

**युसुफ शेख, मुंबई**

# मुंबई वार्ता

## पोरक्या पोरांची अवस्था

**प्रतिनिधी**

अरेरे, काय हे ! सीमावासियांची दखल आता मुंबईत विशेष कोणी घेतच नाही का ? बेळगावचा, कारवारचा प्रश्न म्हणजे मराठी माणसाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न. एक काळ असा होता, की या प्रश्नावर रणचंडिकेचे रूप धारण करण्याची कुवत विरोधी पक्षीयांत होती. आज त्यांचीही वाताहतच झाली आहे असे दिसते.

महाराष्ट्र विधिमंडळाचे अधिवेशन सध्या चालू आहे. तेव्हा ही संधी साधून या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी सीमावासियांनी विधिमंडळाजवळ धरणे धरण्याचा बेत आखला. छोटा मंडप घालून पावसात भिजत बसलेल्या सीमाबांधवांची काळजी फारशी कोणी केली नाही. मुख्यमंत्र्यांसह सारे मंत्री रोज जेथून जातात त्याच मार्गावर हा मंडप होता. असे असूनही त्यांना भेटण्याची तसदी कोणी घेतली नाही. शेवटी शे. का. पक्षाचे आमदार श्री. एन. डी. पाटील व इतरांनी मुख्यमंत्र्याची भेट घेऊन, मुख्यमंत्र्यांनी सीमावासियांची भेट घ्यावी अशी त्यांना विनंती केली. यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्यांची भेट घ्यायचे मान्य केले.

मुख्यमंत्र्यांनी भेट घेतल्यानंतर महाराष्ट्र एकीकरण समितीच्या सदस्यांनी आपले धरणे मागे घेतले. मुख्यमंत्र्यांनी त्यांना म्हणे आश्वासने दिली.

सीमा प्रश्नांची सोडवणूक सर्वस्वी प्रधानमंत्री व संसदेच्या हाती आहे असे सांगून मुख्यमंत्री श्री. नाईक यांनी आश्वासन दिले, की सीमाप्रश्नाचा केंद्राकडून जेव्हा विचार होईल त्या वेळी सीमावासियांना विश्वासात घेतले जाईल.

सीमाप्रश्नाबाबत महाराष्ट्र सरकारची भूमिका म्हैसूरप्रमाणे ठाम नाही. इंदिराबाईंचे नेतृत्व आज्ञाधारकपणे मानणारे मुख्यमंत्री श्री. नाईक, बेळगावची फाळणी या निर्णयाला विरोध करण्याची हिम्मत दाखवतील अशी बिलकूल शक्यता दिसत नाही. या प्रश्नावरील महाराष्ट्र शासनाचे धोरण हे निव्वळ बोटचेपेपणाचे आहे. म्हैसूर सरकार आणि म्हैसूरमधील कॉंग्रेससकट साऱ्या विरोधी पक्षांचे खासदार

या बाबत निश्चितच दूरदर्शी आहेत. सीमा प्रश्नाबाबत म्हैसूरची भूमिका न्याय्य कशी आहे हे, चित्रपट, पुस्तिका वगैरेद्वारा दिल्लीतील संबंधितांना आणि खासदारांना पटवून देण्याचा त्यांचा खास प्रयत्न असतो. मराठी खासदार मात्र स्वस्थ आहेत. नाथ पै होते तेव्हा मोठ्या जिव्हाळ्याने ते या प्रश्नात लक्ष घालीत असत. प्रकृती बरी नसतानाही सीमाप्रश्नावर तावातावाने ते बोलत असत. दिल्लीचे जाऊ द्याच पण महाराष्ट्राच्या राजधानीतही सीमावासी बांधवांची अवस्था पोरक्या पोराप्रमाणे व्हावी हेच मनाला खूप खटकले. ◘

## हा काय कॅम्पस् आहे ?

खरंच हा प्रश्न विचारण्याचीच आता वेळ आली आहे. मुंबई विद्यापीठाने पदव्युत्तर अभ्यासक्रमाची (एम्. ए. ची) डिपार्टमेंटस् फोर्ट विभागातून सांताक्रूझ व कुर्ला यांच्या मधोमध असलेल्या कालिना येथे नेली आहेत. कॅम्पस् वाढवायचा आहे. फोर्ट म्हणजे गर्दी-गोंगाटाचा विभाग, रोज मोर्चे येणार, ही काय अभ्यासालायक जागा आहे ? वगैरे वगैरे कारणांमुळे कॅम्पस् हालविण्याचा निर्णय घेण्यात आला. नवा कॅम्पस् विमानतळाच्या जवळ आहे तेव्हा गोंगाटाचा प्रश्न कसा काय निकालात निघतो ते पहायचे.

नव्या कॅम्पस्मध्ये आवश्यक त्या साऱ्या सोई उपलब्ध होण्याआधीच डिपार्टमेंटस् का हलविण्यात आली हे विद्यापीठच जाणे. पण या कॅम्पस्इतका भयानक कॅम्पस् साऱ्या हिंदुस्थानात तरी असेल की नाही कोण जाणे ? शिपायांपासून ते प्राध्यापकांपर्यंत सारेच याबाबत अत्यंत नाराज आहेत. पूर्वीचा हा दलदलीचा भाग. मुंबईतील कचऱ्याच्या गाड्या तेथे नेऊन त्या कचऱ्याची भर घालून तेथे जमीन सारखी करण्यात आली. (मुंबईत जेथे जेथे म्हणून कचऱ्याची भर टाकून जमिनीसारख्या करून वसाहती निर्माण करण्यात आल्या आहेत, त्या साऱ्याच वसाहती दरवर्षी खचत आहेत असे म्हणतात. कुर्ल्याचे नेहरूनगर तर याचे उत्तम उदाहरण आहे. या नगरात मुंबईतील बरेच पत्रकार राहातात. बिचारे पत्रकार ! ! )

नव्या कॅम्पस्ची अवस्था काही वर्षांनी अशीच झाली तर त्याचे आश्चर्य वाटू नये. कॅम्पस्च्या आवारात झाडे आहेत का ? अगदी झुडपेही नाहीत. पावसाळ्यात तर या विभागाला विहार किंवा पवई तलावाचेच स्वरूप प्राप्त होते. तेव्हा एका अर्थाने हे तरते विद्यापीठ म्हणायला हरकत नाही.

विद्यापीठाला यासाठी फोर्टमध्ये अधिक चांगली जागा पूर्वी मिळत होती. पण त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. अगदी अलिकडे अलिकडे मरिन ड्राईव्ह येथे नटराज हॉटेलचे बांधकाम चालू असताना, त्या हॉटेलचा मालक दोन मजले एम्. ए. चे वर्ग

भरविण्यासाठी देण्यास तयार होता. पण त्याचीही विद्यापीठाने फिकीर केली नाही आणि शेवटी अशी ही दलदलीची जागा घेऊन व अमाप पैसा खर्च करून इमारती बांधल्या. या इमारती बाहेरून दिसायला अत्यंत सुबक आहेत. पण आतून त्या अगदी जेलखाना आहेत. प्राध्यापकांच्या चेंबर्सचे दरवाजे खोक्याच्या लाकडापासून बनविले असावेत असे वाटण्याइतके रद्दी आहेत.

बसमधून उतरल्यानंतर या इमारतीकडे जाण्याचा रस्ता अगदी खराब आहे. वाहतुकीच्या दृष्टीने तरी येथे सोई आहेत का ? याचेही उत्तर नाही असेच आहे. फोर्टमधील जुन्या कॅम्पस्च्या आसपास असलेल्या बसस्टॉपवरून मुंबईतील कुठल्याही भागात जाणारी बस मिळते. चर्चगेट रेल्वे स्थानकही पाच मिनिटांच्या रस्त्यावर आहे. बोरीबंदरही तसे जवळच आहे. याउलट नव्या कॅम्पस्कडे जायचे म्हणजे एकतर कुर्ला किंवा सांताक्रुझ या स्टेशनात उतरावे लागते. त्यानंतर पंधरा-वीस मिनिटापेक्षा अधिक काळ बसच्या रांगेत उभे राहावे लागते आणि सुमारे तितकाच वेळ बसने कॅम्पस्मध्ये पोचावयाला लागतो. कुर्ल्याकडून सांताक्रुझ व सांताक्रुझकडून कुर्ल्याकडे जाणाऱ्या साऱ्या बसेस तुडुंब भरून येतात. यामुळे कॅम्पस्-कडून परत जाताना फारच हाल होतात.

म्हणजे वाहतुकीचा विचार केला तरी एकूण आनंदच आहे. नव्या कॅम्पस्मधील लायब्ररीत अजून पुस्तकांची हवी तशी सोय नाही. तेथे विचारावे तर जुन्या लाय-ब्ररीतून पुस्तके न आल्याचे उत्तर मिळते, तर जुन्या लायब्ररीतून पुस्तके केव्हाच पाठवली गेल्याचे सांगण्यात येते. विद्यार्थी राहूद्यात बाजूला पण प्राध्यापकांनाही पुस्तके मिळत नाहीत. जुना व नवा कॅम्पस् यांच्या दरम्यान मिनि बसेस सोडण्याची योजना होती पण तीही कुठेतरी बारगळलेली दिसते आहे.

कॅंटीनची सोयसुद्धा नव्या कॅम्पस्मध्ये नाही. कॅन्टिनसाठी सुमारे फर्लांगभर चालत जावे लागते. कॅन्टिनच काय पण फोन्स आणि कॉल बेल्सही नाहीत. फक्त विभाग-प्रमुख असलेल्या प्राध्यापकांनाच, शिपायांना बोलविण्यासाठी बेल्स देण्यात आल्या आहेत. इतर प्राध्यापकांनी बेल्स मागताच विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून मासलेवाईक उत्तर मिळाले, ' तुम्हाला बेल्स द्यायला विद्यापीठाकडे पैसे नाहीत. '

हॉस्टेलचे काय ? मुलांसाठी हॉस्टेल आहे पण फक्त ५० विद्यार्थ्यांच्या राहाण्या-चीच तेथे सोय आहे. मुलींसाठी हॉस्टेलच नाही.

विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांची तारीफ करावी असा आणखी एक प्रकार पहा. इतिहास घेऊन एम्. ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांची लेक्चर्स फोर्टमधील एल्फिस्टन कॉलेजात संध्याकाळी असतात. त्यांच्या विभागाचा संबंध असलेले म्युझियम आणि दप्तरखाना फोर्ट विभागात आहे, पण प्राध्यापकांना दिवसभर कालिना येथील नव्या कॅम्पस्मध्ये बसावे लागते. का तर म्हणे विद्यापीठाने तसा निर्णय घेतला आहे म्हणून. फोर्टमधील जुन्या कॅम्पसमध्ये ही सोय करण्यात आली असती पण एवढा

विचार आहे कोणाला ? कोर्ट व वकीलांची ऑफिसेस फोर्टमध्ये आहेत म्हणून जर कायदा विभागाची सोय जुन्या जागेत होते तर इतिहास विभागाची का होऊ नये ?

नोकरी करून एम्. ए. करणारे बरेच विद्यार्थी असतात. फोर्टमधील कचेऱ्यातून काम करणारे हे विद्यार्थी सकाळी लवकर ऑफिसात जात, दुपारी जेवण चुकवत किंवा संध्याकाळी अधिक वेळ ऑफिसात बसत पण दुपारी विद्यापीठात लेक्चर्ससाठी येत असत. आता हे विद्यार्थी कालिन्याला कसे जाणार ? तेथे जायचे म्हणजे सारा दिवसच पाहिजे. अर्थातच इकॉनॉमिक्स-पॉलिटिक्स, हिस्ट्री-पॉलिटिक्स असा ग्रूप घेऊन नोकरी करणारे विद्यार्थी फोर्टमधील जुन्या कॅम्पस्मध्ये भरणाऱ्या संध्याकाळच्या वर्गात बसू शकतात. ती सोय तशीच ठेवली आहे हे खरे, पण एन्टायर इकॉनॉमिक्स, पॉलिटिक्स वा समाजशास्त्र वगैरे विषय घ्यायचे असतील तर कालिन्याला जा असा याचा अर्थ. म्हणजे येथे मनाविरुद्ध जाऊन हिस्ट्री-पॉलिटिक्स वा इकॉनॉमिक्स-पॉलिटिक्ससारखा ग्रुप घेणे त्यांना भाग आहे.

दोन आठवड्यातच एम्. ए. ची लेक्चर्स सुरू होतील. एम्. ए. करणारे विद्यार्थी काय करणार आहेत ?

हे विद्यार्थी अशा कॅम्पस्मध्ये जाणार काय ?

विद्यार्थ्यांचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. पण मुंबईचा विद्यार्थी अगदी शांत आहे. विध्वंसक असण्यापेक्षा शांत असणे उत्तम. पण त्याने विधायकही असू नये का ? निदर्शने वा तत्सम इतर मार्गांचा अवलंब करून या प्रश्नाला वाचा फोडणे हेही मुंबईच्या विद्यार्थ्यांना शक्य नाही का ? असे काही केले तर विद्यापीठ अधिकाऱ्यांची झोप खाडकन् उडेल नाहीतर ते सुस्तच पडून रहातील. एवढा हा ज्वलंत प्रश्न असूनही अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, युक्रांद वगैरे विद्यार्थी संघटना काय करीत आहेत ? की या संघटना फक्त नावापुरत्याच विद्यार्थी संघटना आहेत ? अत्यावश्यक त्या सोई उपलब्ध असल्याशिवाय आम्ही वर्गात बसणार नाही, त्यावर बहिष्कार टाकू, अशी चळवळ शांतपणे करणे विद्यार्थ्यांना जरूर शक्य आहे.



# आवाबेन

'वीज जिथे कोसळते तिथली भूमी अधिक सुपीक होते

**सौ. आशा देशपांडे**

मी आवाबेनला प्रथम पहिली बोरिवली शिबिरामध्ये विजेसारखी लवलवताना, लखलखताना आणि कोसळताना ! कस्तुरबा शिबिर भरले होते व त्यामध्ये आवाबेन सैनिका आणि शिक्षिकाही होती. मृदुलाबेनच्या करड्या शिस्तीची तामिली तर ती करतेच पण बायकांना लेझिम, टिपऱ्या, गरबा शिकवताना अशी काही रंगून जाई की बस्स ! तालासुराची ओढ मलाही असल्याने माझा तो तास फार आवडीचा असे. आवाबेनसारख्या सळसळत्या रक्ताच्या तरुणीपासून तो चार चार मुलांच्या आया असलेल्या प्रौढाही या शिबिरात होत्या. आता त्या काय

हिच्यामागून टिपरी धरणार? सांगा. ठोके चुकत, ताल लयाला जाई, सूर बेसूर होत आणि आवाबेन कडाडू लागे. असले काही असुंदर बघण्यात तिचे डोळे तयार नसत. ऐकण्यास कान राजी नसत आणि मग पुन्हा पुन्हा सर्वांच्याकडून मना-प्रमाणे घडविताना करणाऱ्यांची दमछाक झाली तरी तिचे पाय थांबत नसत. शब्दसुरांच्या लयीत ती विरून जाई. अर्ध्या-कच्च्या, संसारात गुरफटलेल्या त्या स्त्रियांनी समारोपादिवशी शानदार कार्यक्रम सादर केला तेव्हा पाहाणारे लोक चकीत झाले. ही सारी किमया आवाबेनची होती. बघता बघता वेडचावाकडचा दगडातून सुबक आकृतीबंध तयार होत. चैतन्याने नाचू लागत.

या शिबिराला अक्षरशः शेकडो स्त्रिया आल्या होत्या. अनेक ओळखी झाल्या. क्वचित् मैत्रीही जमली पण पुढे असे लागेबांधे जुळायचे होते म्हणून की काय समजत नाही, आवाबेन मनात ठसली ती कायमची. अनुताईच्या प्रशांत प्रकाशात वाटचाल करणारी मी या स्फोटक तेजाने दिपून गेले. खरं म्हणजे थोडी भयभीतही झाले. पण वाटलेले आकर्षण जबरदस्त होते.

एक्कावन्न साली दिरांची सहचारिणी म्हणून ती-आमच्या कुटुंबात आली. तेव्हा मला खूप आनंद झाला. थोडे आश्चर्यही वाटले. समध्येयाने भारलेल्यांचे सहजीवन यशस्वी होईल असा विश्वासही वाटला. पण तिची झेप प्रचंड असल्याने ती आमच्या मराठमोळचा संस्कृतीला कशी काय पेलेल याबद्दल मन साशंकही झाले. पण हे सारे आता सुचलेले बरं का! त्या वेळी घडत असलेली घटना कौटुंबिक आणि सामजिक दृष्टचा केवढी अघटित आहे याची मनाला जाण नव्हती. विचार करण्याइतके भान नव्हते. हा संस्कृती संगम रमणीय व्हावा यासाठी दोघांनाही आपल्या संसारसुखाच्या कल्पनांना, आवडीनिवडींना कशी मुरड घालावी लागेल, वेळीअवेळी अनेक धागे तुटतील, नवे कसे गुंफले जातील कशाचीच दखल घेण्या-इतके मन शांत नव्हते. आवाबेनसारखी तेजशलाका आपलं घर उजळीत येत आहे ह्या आनंदात सगळीच बुडालो होतो. भाऊसाहेबांच्या पंच्याहत्तरीच्या निमित्त सातारला झालेल्या आंतरजातीय विवाहासंबंधीच्या एका परिसंवादात आवाबेन भाषण करीत होती. म्हणाली, 'ही गुजराथमधली लेक महाराष्ट्राची सून झाली. पण नव्या भूमीत फुलणं आणि फुलवणं वाटतं तितकं सोपं नाही. अनेक मायापाश तुटतात; नवे जमऊन घ्यावे लागतात.' मी म्हटलं, 'हे तर एका जातीकुळीच्या विवाहितांनाही करावं लागतं.' मला वाटतं तिचा आवाज थोडा विकल झाला. कारण तिने ज्या लढाया जिंकल्या होत्या, त्यासाठी जी शक्ती वेचली होती त्यांनी तिला थोडा शीण आला होता. पण दुसऱ्याच क्षणी ती नेहमीच्या आवेशाने म्हणाली, 'प्रखर ध्येयनिष्ठा आणि उत्कट भावना हे सार सहज पेलते.' मी पुन्हा मनाशी म्हटलं. 'तिने धरलेला हात इतका बळकट आहे, मिळवलेली साथ इतकी

**पृष्ठ ६० वर**

# आंधळी विद्यापीठे आंधळा समाज

निळू दामले

फेर परीक्षेच्या संबंधात नागपूरच्या विद्यार्थ्यांचा संप झाला. सर्व महाराष्ट्रात धमाल माजून जाईल असे वाटले होते. अनेक प्रश्नांची गुंतागुंत तेथे झाली आहे. परभणीला काही दिवसांपूर्वी कृषी विद्यापीठाचे आंदोलन झाले. वेगळ्या कारणांसाठी ते गाजले. नेहमीप्रमाणे नको त्या गोष्टींनाच प्राधान्य मिळाले. जरुरी असेल तेथे लाचारी आणि नको तेथे शौर्य दाखवायची परंपरा आता रूढ होऊ लागली असे वाटते. काही परखड विचार ह्या निमित्ताने होण्याची आवश्यकता आहे.

नागपूरला सामुहिक कॉपी म्हणजे नेमके काय घडले ?

काही गुंड विद्यार्थ्यांनी परीक्षेला बसताना सुरे परजले. सुऱ्यांना पर्यवेक्षक घाबरले व त्या गुंडांची कॉपी खपवून घेतली. हे पाहून आणखी कमी शूरांचा धीर चेपला. त्यांनी खिशातल्या चिठ्ठ्या चपाट्या वापरायला सुरुवात केली आणि तरीही काही केले जात नाही, हे पाहून वर्गात चक्क पुस्तकांचे गठ्ठे नेऊन कॉपी केली गेली. सर्वच जण कॉपीत सामील झाले. काही कॉलेजेसच्या बाहेर लाऊड स्पीकरवरून उत्तरे सांगितली जात होती.

विद्यार्थी संघटनांनी ह्या कॉपी प्रकरणाचा गुळमुळीत विरोध केला. आणि नंतर तर धोटयांच्या नेतृत्वाखाली अनेक तांत्रिक मुद्द्यांवर फेरपरीक्षांविरुद्ध आता विद्यार्थी उभे आहेत.

कॉपी करण्याची प्रवृत्ती जुनीच आहे. पण आजपर्यंत कॉपी करणाऱ्यांची संख्या लहान होती. गंभीर स्वरूप ह्या प्रश्नाने धारण केले नव्हते. आज मात्र कॉपीचा प्रकार आपल्या समाजाच्या महारोगाचे चट्टे दाखवू लागला आहे.

नागपूरएवढ्या मोठ्या प्रमाणावर व त्या प्रकारची नसली तरी फार भयानक स्वरूपात कॉपी मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षांमधून चालत असते. कॉपी प्रकरण ह्याच वर्षी मी नागपुरात पाहिले आहे, मराठवाड्यातही अनुभवले आहे. सरासरी ४० विद्यार्थ्यांच्या वर्गामधे ५।७ मुली सोडल्या तर ३७ ते ३८ विद्यार्थी कॉपी करतात हा लातूरच्या कॉलेजातला अनुभव आहे. खिशातल्या चिठ्ठ्या, बाकांवर, कपड्यांवर लिहून ठेवणे, बाहेरून प्रश्नांची उत्तरेच नव्हे तर सबंध पेपरच लिहून आणून तोच जोडून पाठवणे हे नित्याचे प्रकार.

नागपूरप्रमाणेच मराठवाड्यातही पहिली कॉपी करणारे व पचवणारे शारीरिक सामाजिक, आर्थिक, जातीय वा राजकीय दृष्ट्या ताकदवान 'बाप्ये' असतात. त्यांना रोखण्याचे सामर्थ्य कोणाच्यातच नसते. आणि मागून सर्रास कॉपी भ्याड मुलेसुद्धा करू लागतात. कॉलेजच्या बाहेर कँटीनमध्ये मदत करणारी तज्ज्ञमुले तयार असतात. वेळ पडली तर गुंड किंवा प्रतिष्ठित दोन्हींचे ताफे आवश्यक त्याप्रमाणे मदतीला सिद्ध असतात.

कॉपी पकडली तर शारीरिक इजा वा नोकरीवरून कमी करण्याचे अप्रत्यक्ष मार्ग ह्यामुळे आम्ही काही करू शकत नाही अशी कबुली अनेक प्राध्यापकांनी नेहमीच दिली आहे.

मुंबई विद्यापीठात प्रत्यक्ष वर्गात काय चालते याची मला कल्पना नाही. पण पैसे घेऊन पेपर विकणाऱ्या प्राध्यापकांचे एक मोठे रॅकेट मुंबईत आहे हे आता तेथल्या विद्यार्थ्यांच्यात गुपीत राहिलेले नाही.

परीक्षेच्या आधी काही दिवस काही प्राध्यापक श्रीमंत विद्यार्थ्यांना शिकवणीसाठी घेतात, आणि शिकवणीच्या नावाखाली काही हजार रुपये घेऊन पेपर विकतात. हे विद्यार्थी नंतर त्याच पेपर्सची जबर किंमत घेऊन खुल्ली विक्री करत असतात.

वर्गात कधीही हजर नसणारे, अभ्यास न करणारे, सदा मारामाऱ्यांमध्ये मग्न असणारे असे विद्यार्थी पास झाले, तेही आधीच खात्री देऊन आणि वर 'काय सांगता सर, पैसा फेको तमाशा देखो ही रीत आहे आजच्या जमान्याची" हे सांगणारे विद्यार्थी माझ्या एका प्राध्यापक मित्राच्या नशीबी आलेले आहेत.

ह्या विद्यापीठांना काय म्हणायचे ? जुगाराच्या अड्ड्यांची उपमा देणे म्हणजे त्या अड्ड्यांचा उपमर्द करण्यासारखे आहे. जुगारी अड्ड्यांवरचे शब्दाला जागणे हे किमान गुन्हेगारी नीतीचे सूत्रही ह्या विद्यापीठांमधून पाळले जात नाही.

प्राध्यापक, विद्यार्थी, समाज ह्या घटकांचा ह्या विद्यापीठांशी काही संबंध आहे ना ? ह्या घटकांची काही कर्तव्ये ह्या विद्यापीठांसाठी आहेत ना ? का हे सर्व घटकच आता पूर्ण भ्रष्ट झाले आहेत. गेंड्याच्या कातडीचे झाले आहेत ?

पृष्ठ ५६ वर

# अय्ययो ! मद्रास्स !

## जुळी मुंबई होऊ लागली मद्रास जुळे होणार ?

नलिनी अंबाडे

मद्रास शहराच्या वाढत्या विस्तारास, आत्तापासूनच नीटपणे वळण लावण्याकरिता 'मेट्रोपॉलिटन कौन्सिल' स्थापन झालेले आहे. आजच्या घडीला ते रेल्वे स्टेशने, बसस्टॉप्सच्या जागा, रहदारीचे प्रश्नांवर सर्व्हे करीत आहे. जुळ्या मुंबईचा प्रश्न का निर्माण झाला ? दाट लोकवस्ती आणि घरटंचाई ! मद्रासचे बाबतीत आज-तरी हे दोन्ही प्रश्न मुंबई इतके गंभीर झालेले नाहीत. तसे गंभीर होण्याची शक्यताही कमीच आहे. कारण मुंबईच्या सर्व बाजूंनी पाणी असल्याने वाढीस आपोआपच मर्यादा पडल्या. मद्रासचे वाढीस तीन दिशा मोकळ्या आहेत. शिवाय आत्तापासूनच योग्य ती काळजी घेण्यास सुरुवात झाल्यामुळे जुळ्या मद्रासचा प्रश्न भेडसाविणारही नाही.

मद्रास शहराचे बाबतीत सर्वांत मोठी डोकेदुखी म्हणजे झोपडपट्ट्या ! 'जेमिनी' तर्फे तयार झालेले सुंदर, रंगीत, भव्य चित्रपट सर्व देशभर प्रसिद्ध आहेत. पण त्याच जेमिनी स्टुडियोच्या कंपौंडभितीला लागूनच दाट झोपडपट्टी आहे. इतकी की, दिवसाही जाण्यास मन कचरावे. झोपडपट्ट्यांचे निर्मूलनाकरिता सरकारने खास 'स्लम क्लिअरन्स बोर्ड' स्थापले आहे. इतर प्रांतांच्या तुलनेने पाहाता, मद्रासचे कार्य खरोखरीच अभिनंदनीय आहे. बोर्डाने प्रथम शहराचा सर्व्हे केला. मद्रास शहर आणि उपनगरे मिळून सुमारे १२०२ झोपडपट्ट्या असून, त्यामध्ये फक्त १,८०,००० कुटुंबे राहातात. सरासरी एका कुटुंबात चौघेजण धरले तर, मद्रास-मधील सुमारे सव्वासात लाख लोक झोपडपट्टीत राहातात. 'स्लम क्लिअरन्स बोर्डाने', खास लॉटरीतून, विमा कॉर्पोरेशन कर्जातून पैसा जमवून आत्तापर्यंत ६००० गाळे बांधलेत. पंधरा रुपये भाड्यात दोन खोल्या. न्हाणीघर व संडास

स्वतंत्र. विजेचे बिल निराळे. आत्तापर्यंतच्या बांधकामातील सर्वात मोठ्या कॉलनीचे उद्घाटन (१८४८ गाळे, खर्च १ कोटी ४० लाख) ११ जूनला श्री. जयप्रकाश नारायण यांनी केले. बोर्डापुढे असणारे काम प्रचंड आहे हे मात्र खरं!

मद्रासला इतकी झोपडपट्टी असण्याची कारणे मुख्य दोन. पुण्याच्या मुळामुठे-प्रमाणे, मद्रास शहरातून 'कुवम्' नदी वाहाते. मद्रास सेंट्रल स्टेशनवर उतरताच तिचे दर्शन होते अन् नाकाला अस्तित्व जाणवते. भौगोलिक कारणांमुळे ही नदी सागराला मिळूनही, कायमची तुंबलेलीच राहिली आहे. तीमध्येच साऱ्या गटारी सोडल्यामुळे अन् पाणी वहाते नसल्याने 'कूवम्' नदीचे दुर्गंधीयुक्त प्रचंड ड्रेनेज बनलेले आहे. गाळामुळे होडचा चालत नाहीत वा घाणीमुळे पाण्याचा उपयोग नाही. ह्या नदीच्या दोन्ही काठांना झोपडपट्टी आहे. तशात भर म्हणून की काय 'बकिंगहॅम कॅनॉल' ह्या गोड नावाचे दुसरे मोठे लांबरुंद न् खोल ड्रेनेज गावातून वहाते—सुमारे १० मैल लांबीचे! ह्याच्याही दोन्ही काठावर झोपडपट्टी. शिवाय कार्पोरेशनच्या पावणेचारशे शाळा, रेल्वे स्टेशन्स, सरकारी जागा अशा 'बेवारशी' इमारतींना लागून झोपडचा आहेतच. बकींगहॅम ड्रेनज झाकण्याकरिता पावणेपाच कोटी रुपये चौथ्या योजनेत मंजूर झाले होते. कालव्याचे एका अंगाने रेल्वेमार्ग व दुसऱ्या अंगाने रस्ता बांधण्यास केंद्रसरकारची मंजुरी मिळालेली आहे.

आपण मुंबईची बरोबरी करावी असं मद्रासला फार फार वाटते. चर्चगेट स्टेशनसमोर भुयारी रस्ता केला, तर आम्हीही मद्रास स्टेशनसमोर 'सब-वे' बांधला. मरीन ड्राईव्हवर 'फ्लाय-ओव्हर' आहे. म्हणून आम्ही देखील जेमिनी चौकात फ्लायओव्हर बांधण्यास कालच्या जानेवारीत सुरुवात केली. जुलैच्या १५ तारखेस रहदारीस तो खुला होत आहे. २८ फुटी रुंद पुलास ८० लाख खर्च आला आहे. मुंबईस सेंट्रल व वेस्टर्न अशा दोन रेल्वे, तशा मद्रासलाही ब्रॉडगेज व मीटर-गेज अशा दोन रेल्वे. इलेक्ट्रिक लोकल गाडचा फक्त मीटरगेजवर धावतात, त्यामुळे मुंबईची सर मद्रासला येऊच शकली नाही. ब्रॉडगेज मार्गावरील लोकल्स म्हणजे निव्वळ कोळशाच्या ढकलगाडचा. पुण्याची सी ओडी देहूरोड लोकल बरी म्हणावी लागते. व्ही. टी. वरून चर्चगेटला रेल्वे नाही, पण दादरला गाडी बदलता तरी येते, पण मद्रासला दोन्ही रेल्वेंचा एकमेकांशी अजिबातच संबंध नाही. पार्क-टौन व सेंट्रल ही दोन जवळजवळची स्टेशने १८०० फूटांचा पूल बांधून जोडण्याची योजना रेल्वेने नुकतीच पास केलेली आहे.

मुंबईप्रमाणे उंच उंच इमारती मद्रासला मुळीच नाहीत. बारा-तेरा मजले म्हणजे कमाल मर्यादा व तशा फक्त दोन-तीनच इमारती आज शहरात आहेत. राज्यसरकारची ६५ मजली सचिवालय योजना जर प्रत्यक्षात खरी झाली, तर आशियातील सर्वात उंच इमारतीचा मान आम्हाला मिळेल. सर्वात वरच्या मजल्या-वर फिरते हॉटेल राहील व एकूण पाचकोटी रुपये खर्च होतील. मद्रासला लौकरच

दोन 'फाइव्ह स्टार्स' हॉटेले होतील. सध्या 'ओबेराय ग्रूप' तर्फे एक झालेले आहे. पाच एकराचे केवळ जागाभाडेच आहे दरसाल साडेसात लाख! येथील आयलंड मैदानावर संरक्षण खाते एका उंच इमारतीसाठी पाया खोदू लागताच, राज्य सरकारने व म्यु. कर्पोरेशनने हायकोर्टात धाव घेऊन, काम बंद करविले.

लहान मुलाची वाढ ही नैसर्गिकरित्या आपोआप होतच असते ना? त्याला नीट खाणेपिणे, औषधपाणी, कपडे वगैरे देऊन त्याच्या वाढीस मदत करणे योग्य. पण तो मोठा व्हावा म्हणून खाद्यांचा, व्हिटॅमिन गोळ्यांचा वर्षाव करून, त्याच्या हातापायांची ओढाताण केली तर? खेड्यांचे गाव, गावाचे शहर, शहरांचे कार्पोरेशन ही वाढ जणू नैसर्गिकच आहे. गरज आहे ती वाढीस नीट वळण लावण्याची. हे बरोबर ओळखून, मद्रासने आत्तापासूनच पावले उचलली आहेत. दिवसेंदिवस झोपडपट्टी कमी होत जाईल अन् शहर अधिकअधिक सुंदर होत जाणार आहे. मुंबईची धावपळ मद्रासला नाही. मुंबईच्या जीवानाचा वेग मद्रासी जीवनास नाही. आत्तापासूनच उपनगरे बाळसे धरू लागली आहेत. तेव्हा जुळ्या मुंबईप्रमाणे जुळ्या मद्रासचा प्रश्न, पुढील २५ वर्षांत तरी उद्‌भवणार नाही असा अंदाज आहे. नवीन जुळे शहर वसविण्यापेक्षा, सध्याच सभोवती असणारी तीन दिशांची तीन शहरे (म्हणजे घुमर्डीपडी, त्रिवेलूर, चेंनगुंड्रम) वाढविण्यासाठी मेट्रोपॉलिटनची बैठक मद्रासला १० जुलैस भरणार आहे. मुंबईच्या बाबतीत १९६० मध्येच असंच झालं असतं तर?

□ □ □


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

# स्थलांतर – एक आव्हान

सौ. तारा पंडित

पु. लं. नी एके ठिकाणी म्हटलंय– 'हॉटेल जितकं लहान असेल तितका उत्तम चहा प्यायला मिळतो.' श्री. बाबा आमटे यांनी प्रयोगाअंती सिद्ध करून दाखविले, की 'जेवढा माणूस गरीब तेवढा तो प्रामाणिक.' ह्या वाक्यांची सत्यता पटू लागते जेव्हा अगदी छोटी छोटी दुकानं एवढ्या मोठ्या शहरात तग धरून असलेली दिसतात. एवढंच नव्हे, अगदी चांगल्या तऱ्हेने ती चालताना दिसतात. ऑफिस विभागात चहा, फळं, पानं इ. छोटचा छोटचा दुकानांशी बाबू लोक दुपारच्या सुट्टीत गर्दी करीत असतात. माल स्वस्त आणि क्वालिटी चांगली मिळाल्यावर माजलेल्या मळचट हॉटेलवाल्यांची पायरी चढायचं प्रयोजनच काय ? ही अशी लहान दुकानं चालवतात कोण ? ते येतात कुठून ? आणि कसे ?

अलीकडे सर्व ऑफिसविभागात मोठाल्या इमारतींच्या आश्रयाला छोटी दुकानं ओळीने लागलेली दिसतात. वर फक्त एक टर्पोलिन उन्हापावसापासून बचावासाठी टाकलेलं. झोपडीवजा ह्या लहानशा जागेत चांगला चहा मिळतो. त्या शेजारीच चणे-मुरमुरे. अगदी भरघोस ओला नारळ आणि काकडीचे बारीक काप टाकून चवदार मूडी (मुरमुरे) तयार करून ते तुमच्यासमोर ठेवतील. शेजारी फळवाले. काचेच्या बंद पेटीतून फळं काढून कुशलतेने त्यावर चाकू फिरवून फोडी तयार करतात नि मीठ-मिरपुड टाकून पानाच्या द्रोणातून तुमच्या हाती देतात. ह्या अशा दुकानांना भांडवल मुळीच नको. जास्त जागेची गरज नाही. टेबलखुर्च्यांची कटकट नाही. उभ्याउभ्याच सगळी देवाण-घेवाण चालते. चहा मिळतो तो मातीच्या 'भांड'मध्ये. कपबशांचं कामच नाही. एरवी त्या स्वच्छ नसल्या की घृणा वाटते. पण हे भांडं प्रत्येकालाच नवं मिळतं. चहा पिऊन तुम्ही ते फेकून द्यायचं. मुडीवाले कागदाचे 'ठोंगे' (लिफाफे) देतात नि इतर खाण्याच्या वस्तू पत्रावळीच्या पानांवर मिळतात. ऑफिस टाईमला ही दुकानं चालवणारे लोक बहुधा बिहारी असतात. येथील सारे चपरासी 'देशात' उपाशी राहणाऱ्या आपल्या बांधवांना घेऊन येतात व ह्या धंद्यात घालतात. एवढंच नव्हे, पानवाले, न्हावी, मोची असेही

धंदे ते करतात. त्यांची एक वसाहतच झाल्यासारखी दिसते. ह्यांच्यामुळे ऑफीसा- तल्या बाबू लोकांची सोय होते आणि ह्यांना पैसे मिळतात. सर्वांचाच फायदा.

आमच्या बंगाली मोलकरणीने मध्यंतरी आपली नणंद आणली व तिला दोन तीन घरी भांडी घासायचं काम मिळवून दिलं. परवा लागलीच जावेला बोलावून घेतलं. मला म्हणाली, " तुमच्या ओळखीच्या कुणाकडे काम मिळू शकेल तर पहा माझ्या जावेला काम हवंय. "

मोलकरणींनी खेड्यातून दुसऱ्या बायका आणणं किंवा चपरासी लोकांनी आपल्या बांधवांना बिहारच्या खेड्यामधून बोलावून घेणं ह्यातून एकच निष्कर्ष निघतो. शहरात काम मिळू शकतं. वाटेल तो धंदा करता येतो. पोट भरता येतं. खेड्यात राहून पोट भरायची मारामार. साहजिकच खेडुतांचं लक्ष शहराकडे आकर्षित होऊ लागलं. ते भराभर शहरांमध्ये येऊन वस्ती करू लागले. कलकत्ता ह्याला अपवाद नाही. ह्यातच भर म्हणून की काय खेड्यातले अनेक लोक उपास- मार होत आहे असे पाहून प्रथम मेळाव्याने शहरात प्रवेश करतात नि वेगवेगळ्या विभागात वेगवेगळे जाऊन भीक मागण्याचा धंदा करू लागतात. धंद्यात चांगला जम बसला तर पुन्हा परतीचा विचारही करीत नाहीत. ते इथेच स्थायिक होतात.

परिणामत: शहरातील लोकसंख्या भरमसाठ वाढण्यास सुरुवात झाली आणि जागेची समस्या निर्माण झाली – जास्त तीव्रतेने जाणवू लागली. एकेका खोलीत अनेक कुटुंबे राहात आहेत किंवा अनेकांचे संसार चक्क फूटपाथवरच चालतात. त्यांची मुलेही तेथेच वाढतात आणि थोडी मोठी झाली, की पाठीवर झोळी घेऊन रस्तोरस्ती हिंडून कागद गोळा करू लागतात. त्यांनाही धंदा गवसतो. पंचाईत फक्त सुशिक्षित बेकारांची होते. त्यांना पांढरपेशे असल्याकारणाने वाटेल तो धंदा करता येत नाही. खालच्या वर्गातला अशिक्षित माणूस चार पैसे कमवून जातो पण आजचा सुशिक्षित तरुण नोकरीची मार्गप्रतीक्षा करीत तसाच बसून राहतो.

आज कलकत्त्यात सुमारे ३० लाख लोक राहातात. त्यांनी व्यापलेली जागा ४९० चौरस मैल इतकी आहे. १९६१ च्या अंदाजानुसार दर चौरस मैलाला ७३,६४२ लोकसंख्या हे प्रमाण आहे. न्यूयॉर्क, अमदाबाद व दिल्ली येथील ते प्रमाण दर चौरस मलास अनुक्रमे २७,९००, ५६,६४० व ४१,२८० असे आहे. आज परिस्थिती अशी आहे, की ९ लाख लोकांचे वास्तव्य अत्यंत गैरसोयीच्या ३ हजार झोपडपट्ट्यांमध्ये असलेले दिसून येते. १९६१ च्या गणतीनुसार कलकत्त्यात नव्याने आलेल्या लोकसंख्येचा आकडा ७,८४००० होता. ह्यांनीच शहराची ७० टक्के लोकसंख्या व्यापून टाकली. १९८९ च्या सुमारास बाहेरून आलेल्या लोकांची संख्या १ लक्ष २० हजार पर्यंत जाईल असा अंदाज आहे. अशा वेळी शहराची दशा काय होईल याची कल्पनाच करणे कठीण !

ह्या वाढत्या लोकप्रवाहावर नियंत्रण घालणे हेच आज प्रथम कर्तव्य समजणे आवश्यक आहे. ज्यांना गरज नाही अशा लोकांचे शहरात होणारे स्थलांतर वेळीच थांबवायला हवे. नोकरीधंदा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देणे हेही तितकेच

महत्त्वाचे ठरते. खेड्यामधील जीवन सुधारून तेथेही आधुनिक सोयी निर्माण केल्याने देखील ह्या स्थलांतराचे प्रमाण आटोक्यात आणणे शक्य आहे. मागे एकदा पं. नेहरू म्हणाले होते की, "कलकत्त्याच्या समस्या म्हणजे संपूर्ण राष्ट्राच्याच समस्या आहेत. फक्त पश्चिम बंगालपुरत्याच त्या मर्यादित नाहीत. त्याकडे विशेष लक्ष पुरविणे आवश्यक आहे. ह्या शहराचे जर तुकडे तुकडे झाले तर फार मोठी शोकांतिकाच होईल." ◻

## जन्मसिद्ध हक्क

कोणे एके काळी लोकमान्य टिळक नावाच्या महापुरुषाने 'स्वातंत्र्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे' असे म्हणून लोकजागृतीचे महत्कृत्य केले, आज कलकत्त्यातील चतुष्पाद प्राण्यांनादेखील रस्त्यांवर हिंडताना आपले हक्क काय आहेत याची पूर्ण जाणीव आहे. तुम्हीच सांगा, गाईच्या अंगावरून एखादी मोटार गेल्याचं किती वेळा कानांवर येतं? फारच क्वचित! इथली गुरंढोरं म्हणजे पायी चालणारांमध्ये सर्वोत्तम प्राणी. चार चाकांची वाहनं आपल्यापेक्षा कमी प्रतीची आहेत हा भाव सदैव त्यांच्या तोंडावर दिसतो. डुलत डुलत रस्त्यांवरून हिंडताना किंवा रस्ता ओलांडण्यासाठी आखलेल्या मार्गात आराम करीत बसताना किंवा मधेच कुठेतरी रवंथ करीत उभे असताना वाहनांच्या कर्कश पोंग्यांना किंवा पोलिसांच्या शिटचांना हे प्राणी मुळीच भीक घालीत नाहीत.

शेळचामेंढचांचे कळप चरायला जाता येता गर्दीच्या रस्त्यातूनही अचूक मार्ग काढीत जातात. (अर्थात ह्यात राखण करणाराचेही नैपुण्य आहेच.) वाहनांच्या मार्गात मात्र त्याचबरोबर अजाणता अडथळेही ते निर्माण करीत असतात. एकदा ट्रामच्या मार्गावरच एक कोकरू ठाण मांडून बसलं. ट्राम पुढे सरकणं मुष्किल झालं. काही वेळाने ते पिलू ट्रामला ढुशा देऊ लागलं. हे दृश्य पाहून रस्त्यावरचे लोक हसू लागले व प्रोत्साहनाचे उद्‌गार काढू लागले. कोकराला मग आणखीच स्फूर्ति आली. बऱ्याच वेळाने त्याच पिलाच्या शोधात फिरणारा राखणदार तेथे उपस्थित झाला नि त्याने ते पिलू उचलून नेलं.

ह्या बाबतीत कुत्रीमांजरे फार हुषार असतात. कुठे आणि केव्हा रस्ता ओलांडावा हे त्यांना अचूक कळतं.काहींचं तर ट्राफिक लाईटकडे देखील लक्ष असतं, उन्हाळचाच्या दिवसात रस्त्याच्या बाजूला थांबलेल्या वाहनांच्या सावलीत कुत्री आराम करतात. पण ड्रायव्हर आत शिरला किंवा त्याने गाडी स्टार्ट केली, की लगेच ती कुत्री मुकाटचाने उठून पळून जातात. ह्या प्राण्यांना रस्त्याचे नियम कुणी शिकवले? त्याची ही उपजतबुद्धी असावी काय? किंवा शहराच्या वातावरणाशी समरस झाल्याने त्यांना हा समज प्राप्त झाला असावा? काही का असेना, चतुष्पाद प्राणी कलकत्त्याच्या भर गर्दीच्या रस्त्यावर देखील अगदी सुरक्षित असतात एवढं खरं. अशा रस्त्यावरून बेफिकीरपणे हिंडणं हा यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे! ◻ ◻ ◻

# आगाऊ आत्मकथा-एका कवीची

रवींद्र पिंगे

कम्युनिस्ट राजवटीतल्या लेखकांची खरी परिस्थिती काय आहे ह्याचा धड पत्ता कुणालाच लागत नाही. स्टॅलीनने आपल्या जुलमी राजवटीत लेखन स्वातंत्र्यावरून वरवंटा फिरवला होता ह्याचे लाख पुरावे आता शाबीत झालेले आहेत. मॅक्झिम गॉर्की हा केवळ रशियाचाच नव्हे तर उभ्या जगाचाच एक थोर लेखक. त्याच्या मुलाचा खून केल्याचा वहीम स्टॅलीनवर होताच. त्याने असे शेकडो कवी वधस्तंभाकडे धाडले. आता जगभरच्या साम्यवादी राजवटी पालटल्या आहेत. राजकीय पक्षाच्या आदेशाविरुद्ध जे ब्र काढीत नाहीत, त्या लेखकांना अभय सर्वच साम्यवादी देशात आहे. प्रचारकी साहित्याचा कारखाना उघडणाऱ्यांना तर त्यांचा धंदा चांगलाच किफायतशीर होत असणार. पण भाडोत्री बोरूकाम करणाऱ्या भडभुंज्यांची चलती कुठल्या देशात नसते ? प्रश्न आहे तो अंतःप्रेरणेने सत्यदर्शन करणाऱ्या प्रतिभावान लेखकांचा. असे व्रती लेखक सर्वच देशांना फार महाग पडतात. पण असेच लेखक अखेर त्या त्या देशाला आणि भाषेला ललामभूत होतात. चिनी लेखक-कवींची आज लाल चीनमध्ये काय स्थिती आहे, हे अजूनही गूढ आहे. ते जर हयात असलेच तर एकतर ते कुठल्या तरी शेतावर नांगर तरी फिरवीत असतील किंवा माओचा पोवाडा तरी खरडत असतील. खुद्द रशियातसुद्धा पास्तरनाक किंवा सध्याचे सोल्झेनित्सीन प्रकरण फार गरम पडले आहे. पहिल्या दर्जाच्या सत्यव्रती लेखकाला साम्यवादी राजवटीत न्याय मिळत नाही असाच त्याचा अर्थ जगभर लावला गेला आहे. अर्थात, साम्यवादी राज्यकर्ते असल्या असंतोषाला हिंग लावूनसुद्धा विचारीत नाहीत. त्यांचा रथ ठरल्या रुळावरून दौडतच असतो.

असं असूनही काही तरुण साम्यवादी लेखक आपले अंतःकरण धडाक्याने मोकळे

करीत आहेत आणि त्यांना त्या राजवटींनी विरोध केलेला नाही. किंबहुना असे धडाकेबाज मनोगते लिहिणारे बंडखोर कवी साम्यवादी देशात अव्वाच्या सव्वा लोकप्रिय आहेत. अशांपैकीच चाळीशीच्या उंबरठ्यावरला येवतुशेन्को हा रशियातला आजचा सर्वात लोकप्रिय तरुण कवी आहे. त्याचा जन्म सैबिरीयातला. शिक्षण मॉस्कोला झालं. वयाच्या अवघ्या आठव्या वर्षापासून तो सपाटून लिहीत आहे. कम्युनिस्ट क्रांतीच्या तत्त्वावर पूर्ण श्रद्धा असलेले आपण निधडच्या छातीचे अस्सल रशियन लोककवी आहोत अशी त्याची स्पष्ट भूमिका आहे. त्याचे कविता संग्रह लाखांनी खपले. क्रुश्चेवच्या सैल कारकीर्दीत त्याने जगपर्यटन केले. अडुसष्टसाली ऑक्सफर्ड विद्यापीठात त्याला सन्मानीत कवी म्हणून वास्तव्यासाठी बोलावून घेण्याचा प्रयत्न फसला. गॅलीना नावाच्या सैबिरीयातल्या तरुणीशी त्याने संसार थाटला आहे.

आपले कुसुमाग्रज आणि चंद्रकांत वर्तक ह्यांनी येवतुशेन्कोच्या चार कवितांचे केलेले अनुवाद 'सोविएत रशियाची पन्नास वर्षे-खंड दुसरा (समाज आणि साहित्य)' ह्या समाज प्रबोधन संस्था आणि मौज प्रकाशन गृह ह्यांनी संयुक्तरित्या प्रकाशित केलेल्या ग्रंथात समाविष्ट केलेले आहेत.

रशियातल्या तरुण पिढीच्या स्वप्नांचा ध्येयवादी भाष्यकार अशी पदवी प्राप्त झालेल्या ह्या कवीने 'A Precocious Autobiography' ह्या नावाचे घाटदार, ललितमधुर, सत्यग्राही आणि अगदी आटोपशीर, छोटेखानी आत्मचरित्र प्रसिद्ध केले आहे. प्रिकॉशीयस् म्हणजे आगाऊ. आगाऊ आत्मकथा. क्रांतीनंतर निष्पाप वृद्ध नागरिकांच्या धरपकडी कशा झाल्या, केवढं क्रूर हत्याकांड कसं पेटलं, रशियात जॅक लंडन, चार्ल्स डिकन्स, हेमिंग्वे वगैरे परदेशी लेखक कसे तुफान लोकप्रिय आहेत, कवी व्रत घेतो म्हणजे नेमकं काय करतो, लेखक स्वतःच्या अभिरुचीची मशागत कशी करून घेतात, वगैरेंचे फार परिणामकारक चित्रण त्याने केलं आहे, ते मुळातूनच वाचण्यात निखळ आनंद आहे. कवि कुसुमाग्रजांनी ह्या आत्मचरित्रावर एक उत्कट परामर्ष घेणारा लेख लिहिला आहे. त्या लेखात ते म्हणतात, 'असे हे 'आगाऊ' आत्मवृत्त. एका तुफानी, रंगीत, निर्भय आणि प्रांजळ व्यक्तिमत्वाचा उलगडा करून दाखवणारे. कोणीतरी मराठीत भाषांतर करण्यासारखे.' अर्थात, कुसुमाग्रजांचं हे आवाहन त्यांच्याच जातकुळीतल्या तन्मयता वश असलेल्या आणि शैलीचा गुलाम नसलेल्या अभिजात लेखकाला आहे. मला नव्हेच नव्हे. तरीसुद्धा तरुण रशियन लेखक कसं लिहितात, भारतीय लेखकांना अत्यंत आवडणारा भाबडेपणा कसा कटाक्षाने टाळतात, काय सुचवतात, सत्याला कसं भिडतात, काय पहातात, काय टिपतात, ह्याचा छोटेखानी नमुना पेश करावा म्हणून त्या अल्पाक्षरी आत्मचरित्रातल्या दोन प्रकरणांचा हा रसानुवाद मुद्दाम सादर करीत आहे. कवींची क्षमा उदार आहेच.

१५ जुलै १९७२

## १. स्टॅलीनचे अंत्यदर्शन

५ मार्च १९५३ ला झालेला स्टॅलीनचा मृत्यू ही सगळ्या रशियाला हादरवून टाकणारी घटना ठरली. स्टॅलीन हा माझ्या जीवनाचा इतका अविभाज्य भाग बनला होता, की त्याच्या मृत्यूची मी कल्पनाही करू शकत नव्हतो.

उभ्या देशाला अर्धांगवायूचा झटका आल्यासारखं झालं. स्टॅलीन हाच साऱ्यांचा सांभाळकर्ता आहे हीच शिकवण मिळालेले सारेजण गोंधळून गेले; तो नाही ह्या कल्पनेने भयचकीत झाले. सर्व देश रडला. मीही रडलो. दुःखावेगानेच आम्हाला रडू फुटलं. कदाचित भविष्यकाळाची भीती वाटूनही रडलो असू.

लेखकांच्या सभांमधून कवींनी हुंदके देऊन देऊन स्टॅलीनवर स्तुतिसुमनं उधळली. व्हारडोव्हस्की केवढा अगडबंब आणि ताकदवान माणूस. त्यानेही कापऱ्या आवाजात कविता वाचल्या.

स्टॅलीनचं शव पाहायला आम्ही गेलो त्याचा मला विसर पडणार नाही.

ट्रूबनाया चौकातल्या गर्दीत मी होतो. एकमेकांवर चेपलेल्या लाखो माणसांच्या श्वासोच्छवासाची वाफ इतकी दाट झाली होती की मार्च महिन्यातल्या पर्णहीन झाडांच्या सावल्यासुद्धा त्या वाफेच्या पटलावर दिसू लागल्या. ते एक भीतिदायक, अक्राळविक्राळ दृश्य होतं. माणसांच्या नव्या नव्या झुंडी त्या मानवी सागरात कोसळत होत्या. लट्ठालठ्ठी वाढत होती. गर्दीचं रूपांतर राक्षसी चक्रीवादळात झालं. रहदारीचं नियंत्रण करणाऱ्या दिव्याच्या दिशेने मी ढकलला जात असल्याचं माझ्या लक्षात आलं. तो खांब आपसुख जवळ जवळ येऊ लागला. एक तरुणी त्या खांबावर चेपली जात असल्याचंही मला चटकन दिसलं. चित्कारणारा तिचा चेहेरा वेडावाकडा झाला होता. गर्दीच्या आरोळ्यात आणि गोंगाटात तिचा आवाज ऐकूच येत नव्हता. गर्दीच्या लोंढ्याने मला तिच्याच दिशेने ढकललं. खांबावर चेपल्यामुळे त्या तरुणीची हाडं मोडल्याचा आवाज झाल्याचंही, तो आवाज धड न ऐकताच, माझ्या लक्षात आलं. भीतीने मी डोळे मिटले, कारण बाहेर पडलेली तिची इवलाली निळी बुबुळं मला पहावेनात. तिच्या बाजूनेच मी पुढे ढकलला गेलो. परत मागे वळून पाहिलं तर ती तरुणी दिसलीच नाही. तिला गर्दीने तुडवलं असणार. आता त्या खांबावर चेपला गेलेला दुसराच कुणी माणूस मला दिसला. ख्रिस्ताच्या हातासारखे त्याचे हात पसरलेले होते आणि शरीर वाकडंतिकडं झालेलं होतं. त्याच क्षणी मला जाणवलं, की आपल्या पायाखाली काही तरी मऊ मऊ आलंय. तो मानवी देहच होता. मी पाय उचलला आणि तशा अधांतरी स्थितीतच गर्दीने मला पुढे ढकललं. पाय टेकायची मला बराच वेळ भीती वाटत होती. गर्दीची चेपाचेपी फारच वाढली. मी उंच होतो म्हणून बचावलो. ठेंगणी माणसं घुसमटूनच मेली. एका बाजूला घरांच्या भिंती होत्या. दुसऱ्या बाजूला लष्करी ट्रक्स उभे होते आणि त्या दोहोंच्यामधल्या बोळकंडात आम्ही सापडलो होतो.

लोक ओरडत, 'ते ट्रक्स हलवा की वाटेतून ! ते ट्रक्स हलवा म्हणून सांगतोय ना आम्ही ?"

'शक्य नाही हो. आम्हाला तसे हुकूम नाहीत.' ट्रकमधल्या एका चक्रावलेल्या तरुण पोलीस अधिकाऱ्याने ओरडून सांगितलं. अगदी जीवाच्या आकांताने सांगितलं. गर्दीत सापडलेली माणसं ट्रक्सवर चेपली जात होती. त्यांची डोसकी ट्रक्सवर आपटली जात होती. ट्रक्सच्या दोन्ही बाजूंना रक्ताचे ओहोळ फुटले होते. मला एकाएकी राक्षसी तिरस्कार वाटला. कुणाच्या तरी मूर्खपणामुळे लोकांचं मरण ओढवलं जात असताना 'हुकूम नाहीत' असे शब्द त्यांच्या तोंडावर फेकण्याच्या वृत्तीचा जन्म ज्या ज्या गोष्टींमधून झाला त्या त्या सर्वांची मला मनस्वी चीड आली. ज्याच्या दफनाला आम्ही निघालो होतो त्याचा मला आयुष्यात प्रथम तिरस्कार वाटला. त्या प्रलयातून तो नामानिराळा राहूच शकत नव्हता. 'हुकूम नाहीत' ह्या एकाच गोष्टीमुळे त्याच्या अंत्ययात्रेला रक्तपात नि गोंधळ झाला. मला एकाएकी प्रचिती आली की मानवी जीवनच जर धोक्यात असेल तर हुकूमाची वाट पाहाण्यात अर्थ नसतो. आपण तत्काळ कृती केली पाहिजे. कसं घडलं ते मला धड कळलंच नाही, पण मी हात सरसावून आणि मुठी वळून लोकांना मागे सारीत पुढे आलो नि ओरडून सांगितलं,

"अरे, साखळ्या करा ! साखळ्या करा !"

लोकांना कळेना. म्हणून मी जवळच्या लोकांचे हात धरून सक्तीने त्यांना साखळ्या करायला लावल्या. तोंडाला येतील ते शालेय जीवनात शिकलेले अचकट विचकट शब्द वापरले. काही धष्टपुष्ट तरुण माझ्या मदतीला आले. मग लोकांच्या ध्यानात आलं. हातात हात पकडून त्यांनी साखळ्या केल्या. ते तगडे तरुण नि मी स्वत: जातीने साखळ्या करून देऊ लागलो. त्यामुळे गदारोळ शांत होऊ लागला. गर्दीचं रानटी पशूपण निवळायला लागलं. 'बायांना नि पोराटोरांना ट्रक्समध्ये चढवा' एक तरुण म्हणाला. लगोलग बायका-मुलं वाट काढत काढत आमच्या डोक्यांवरून ट्रक्समध्ये चढली. ट्रक्समध्ये चढत असलेली एक बाई एकाएकी बेफाम झाली. किंचाळू लागली. ट्रकमधल्या पोलीस अधिकाऱ्याने तिचं सांत्वन करीत तिचं मस्तक थोपटलं. तिचं अंग थरथरलं, थरथरलं आणि एकदम ताठ झालं. पोलीस अधिकाऱ्याने आपल्या टोपीने तिचं तोंड झाकलं आणि तो धाय मोकलून रडू लागला.

पुढे आणखी नवाच गदारोळ वाढून ठेवलेला होता. ती आडदांड पोरं आणि मी तिथवर पोहोचलो. शिव्यांचा नि मुठींचा उपयोग केला आणि लोकांच्याच रक्षणासाठी त्यांच्या साखळ्या लावून दिल्या.

शेवटी पोलीसही आमच्या मदतीला आले.

पृष्ठ ५३ वर

# नव्या वाटांच्या शोधात

'मुलगी होस्टेलमध्ये राहातीय म्हणे. होस्टेलमधल्या मुली वागायला चांगल्या नसतात असं आपल्या रखमाबाई म्हणत होत्या हो मनुताई.' ठसक्यात हा शेरा मथुआक्का आपल्या शेजारीणबाईंना कानगोष्ट केल्याच्या आविर्भावात देत आहेत. समोर दोन्ही खांद्यावर पदर घेऊन, खाली मान घालून नीलिमा बसली आहे. तिचा बुजरेपणा घालवण्यासाठी वरपक्षातला खुद्द नवरदेव वसंत (सुधा) अधूनमधून प्रश्न विचारतो आहे. दोन्ही पक्षातील मंडळी सुचतील ती प्रश्नोत्तरं करीत आहेत आणि मुलीचे वडील (शारदा) तर त्यांच्या चेहऱ्यावरील हावभावांवरून कोणालाही ओळखू यावेत. या सर्व मंडळींच्याभोवती चाळीस-पंचेचाळीस विद्यार्थिनी श्वास रोखून हा एकदम उपटलेला 'दाखवणे' कार्यक्रम पाहाताहेत.

हा देखावा कुठं नाटकात वगैरे चाललेला नाही. पुण्यातल्या विद्यार्थी सहाय्यक समितीच्या लाला लजपतराय भवनाच्या प्रशस्त हॉलमध्ये वासंतिक वर्गातला एक ऐन वेळचा, उत्स्फूर्त असा Role Play रंगलेला आहे. आयत्या वेळची भाषणं ऐकतो तसाच हा प्रकार. आयत्या वेळेवर घडवलेला, खेळलेला एक प्रसंग. विद्यार्थिनीची कल्पनाशक्ती, प्रसंगावधान, सहजता आणि अशा कितीतरी गोष्टी अशा खेळांमधून प्रत्ययाला येतात. सारा दहा-पंधरा मिनिटांचा खेळ. त्यानंतर रोखून धरलेले बाजूच्या प्रेक्षकांचे श्वास सुटतात. न् मग येते त्यांची पाळी.—'आताच्या खेळात आपापली भूमिका प्रत्येकानं कशी केली? कोण चुकलं, कोण बरोबर वाटलं.' यावर प्रेक्षकांपैकी प्रत्येकानं आपलं मत द्यायचं. सूचना मिळाली न् प्रत्येक मुलगी आपापलं स्पष्ट मत देते. त्यांचींही विचारशक्ती काम करायला लागते. आपलं मत इतरांसमोर नीट मांडायचा अनुभव मिळतो. पहा तरी एकेकीचा अभिप्राय :

—मुलीच्या चेहऱ्यावरचे भाव वाजवीपेक्षा जास्त नम्र वाटले. या काळात यापेक्षा अधिक धीटपणानं तिनं वागायला हरकत नव्हती.

—शेजारीण काकू व चुणचुणीत नणंद छान वाटल्या.

—मुलगा (सुधा) जरा जादापणानंच वागला. अशा प्रसंगी वडिलमंडळींच्या-

समोर मुलीला सिगारेट ओढण्याची परवानगी विचारणं योग्य नव्हतं. खुर्चीवर पाय पसरून बसण्याएवजी त्यानं आदबशीर बसणं आवश्यक होतं.

—मुलीच्या पाठीवर थोपटून मुलीला धीर देण्याचा तिच्या वडिलांचा (शारदा) प्रकार बरोबर नाही वाटला. ते आवश्यक नव्हतं.

—मुलीची आई फारसं बोलली नाही. मुलाच्या आईनं तिला बोलतं करायला हवं होतं...

अशा एक का दोन सांगाव्यात इतक्या स्वच्छ प्रतिक्रिया प्रेक्षकांनी व्यक्त केल्या. एक प्रसंग, मग तो कुठलाही का असेना त्याकडे किती निरनिराळ्या प्रकारानं पहाता येतं, पहाणं आवश्यक असतं हे दाखवण्याचं काम या Role Play च्या माध्यमातून सहजपणानं साधलं जातं.

दोन अडीच तासातला एकही क्षण कंटाळवाणा न वाटता चाललेला हा खेळ या वासंतिक वर्गातल्या अनेक कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम होता. सर्व मुलींनी या प्रकाराचे फार स्वागत केलं. प्रत्येकीला यात स्वत:ला काहीतरी करायला मिळाल्याचा आनंद मिळाला होता. असे आणखी कितीतरी प्रसंग घेऊन त्यांच्या कल्पनाशक्तीला आवाहन करणं शक्य आहे.

याशिवाय जीवनाशी निगडीत अशा काही विषयांवर लहान लहान गटांमध्ये चर्चा घडवून आणण्याचे उपक्रमही अनेक वेळा केले गेले. चारचौघांमध्ये बोलण्यासाठी यातूनच आत्मविश्वास निर्माण होत असे. शाळा कॉलेजमध्ये जी संधी मिळत नाही ती मिळाल्यास केवढा मोठा फरक जाणवतो याची ही प्रचीतीच.

लजपतभवनच्या गच्चीवर आज रात्रीच्या वेळी सर्व मुली जमल्यात. कार्यक्रमाबाबत पूर्वसूचना काहीच नाही. सुखद वारा नू शांत वातावरण. निरभ्र आकाश या शांततेला उगीचच गंभीर करतंय की काय असा भास होतो आहे. आता अशा वेळी पूर्वसूचना नसली म्हणून काय झालं ? कल्पना शक्ती आहे, समोर साठ मुली आहेत महाराष्ट्रातल्या दूरदूरच्या गावामधून आलेल्या. काहीतरी नवीन शिकायला मिळणार या अपेक्षेनं आपल्या उन्हाळ्याच्या सुटीतला तीन आठवड्यांचा काळ घेऊन आल्या आहेत. प्रत्येक अनुभवासाठी उत्सुक आहेत. दैनंदिन कार्यक्रम सकाळी सहापासून सनईच्या मंगल सुरांनी चालू होतात. दिवसभर निरनिरळ्या विषयांवर व्याख्यानं, प्रात्यक्षिकं, छंदवर्ग, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम असे भरगच्च पण शिस्तशीर कार्यक्रम चाललेत. आपापल्या विषयांमधील तज्ञ मंडळी येताहेत, शक्य त्यांच्याशी परिचय होतो आहे, मुळातच कमी असलेल्या मोकळ्या वेळात मुली आपला अभ्यास व इतर कामं करताहेत. वातावरण नेहमीच प्रसन्न आहे. जणू त्या

## लजपतराय भवनातील एकवीस दिवस

वास्तूत ज्ञानदानाचं एक अखंड सत्र चालू आहे.

आज रात्री कोणाचं व्याख्यान नव्हतं न् कुठलंही प्रात्यक्षिक नव्हतं. सतत दुसऱ्यानंच काहीतरी सांगायचं न् मुलींनी ऐकायचं, हे का ? आज मुलींनीच मुलींशी बोलायचं अशी सूचना आहे. काय वाटेल ते बोलायचंय. एकमेकींना विश्वासात घ्यायचंय. आपली मनं मोकळी करायचीत. आपापली सुखदु:खं सांगायचीत. अडी-अडचणी बोलून दाखवायच्यात. गाण्यात बोलायचं, कवितेत सांगायचं, नृत्याचा आविष्कारही तर चालू शकणार आहे. सगळी सगळी मुभा दिली गेली होती.

एक दोन तीन चार न् अशाच सर्वजणी बोलून गेल्या. कमी अधिक प्रमाणात मोकळेपणानं. ही लता पाहिलीत का? या इवल्याशा वीस-एकवीस वर्षांच्या आयुष्यात काय काय पहाते आहे, सोसते आहे न् त्यातूनही शिकण्याची जिद्द बाळगून आहे. प्रथम बिचकत बावरत न् मग अगदी निर्धास्तपणानं मन उघडं करते आहे. न् या स्मिता, नीलीमा मधूनच या स्तब्ध वातावरणातून उठून का गेल्या ? डोळेही लाल दिसताहेत. लताच्या स्वरचित काव्य वाचनाचा तर हा परिणाम नव्हे ? लताची आई तिच्या लहानपणीच तिला सोडून गेली. लताला ते फार फार जाणवतंय. तिनं आईवर एक सुरेख कविता केलीय न् ती आपल्या बोलण्याच्या ओघात सहजपणे वाचून दाखवते आहे. स्मिता नीलिमाच का पण कुणाच्याही डोळ्यात पाणी उभं रहावं इतके ते वातावरण लताच्या भावनांशी समरस झालं होतं. कालपरवापर्यंत माहिती नसलेली ही तरुण पोर केवढ्या विश्वासानं, प्रामाणिक-पणानं आपलं मन उलगडून दाखवते आहे !

आणि ही कमल ! शेपाचशे वस्तीच्या खेड्यातून आलेली अबोल मुलगी. आपल्याला चार चौघात बोलता येणारच नाही ही खात्री बाळगणारी. साठ मैत्रिणींसमोर प्रथमच बोलणार होती. किंचित्सं बिचकणं संपलं न् आपल्याला छान बोलायला येतेय याचा तिला शोध लागला. कमलच्या आयुष्यात तिला द्यावी लागणारी झुंज मुलींना अचंब्यात टाकून गेली. तिच्या हातून झालेल्या चुकांची तिनं इतरांसमोर जी प्रांमाणिकपणानं कबुली दिली ती ऐकून आणि काहीही झालं तरी हिंदीमध्ये Ph. D. करणार हा निर्धार ऐकून क्षणभर सर्वजणी सुन्न झाल्याचं आठवतंय. भल्याभल्यांजवळ असे धाडस नाही. ते ती सहजपणानं दाखवून गेली.

दर आठवड्याच्या कार्यक्रमाबाबत मुलींना प्रश्नावली दिली जाई. त्यांनी त्यांच्या खोल्यांमध्ये, मैत्रिणींशी चर्चा करून उत्तरे लिहायची होती. नजिकच्या भविष्यात त्यांना ज्या प्रश्नांना तोंड द्यायचं आहे अशा विवाह समस्या, हुंडापद्धती, सामाजिक प्रश्न, जातिभेद वगैरेबाबत अनेकांच्या प्रतिक्रिया बोलक्या वाटल्या. त्यांच्या मना-मध्ये अस्पष्टपणानं चाललेल्या विचारांना वर्गातील चर्चा, प्रश्नोत्तरे, व्याख्याने यांच्या सहाय्यानं वाट फुटली [असावी का ? व्यक्तीविकास आणि सामाजिक

स्वास्थ्य या प्रश्नाच्या संदर्भात ही सिंधू काय लिहिते पहा,...पदवीधर मुली परंपरेनुसार वर्तन करतात. परंतु नव्या परंपरा पाडायला तयार नसतात. शास्त्रीय दृष्टी स्वीकारायला आम्ही जोपर्यंत तयार होत नाही, तोपर्यंत स्त्रिया सुधारल्यात असं आम्ही म्हणू शकत नाही....

.. पुढच्या आयुष्यात मला काय करायचंय? लग्न केल्यावर संसार करीत असताना काही जिद्द माझ्यामध्ये आहे का? हुंड्यासारख्या दुष्ट पद्धतींबाबत मी काही जाणीवपूर्वक विचार करणार आहे का? या जाचक रुढीची तीव्रता पटल्यावरही रुळल्या वाटेनं जाईन का? ही पद्धत बंद होत नाही तोपर्यंत आधुनिकतेचा दावा करण्यात काय अर्थ आहे? काळाची ही आव्हानं आम्ही स्वीकारायला तयार आहोत का! हा प्रश्न आहे.'

सामाजिक प्रश्नांची धावती ओळख व्हावी म्हणून काही संस्थांना भेट देण्याचा कार्यक्रम होता. सेंट क्रिस्पीन्स होम या अनाथ मुलांच्या संस्थेतून परतल्यावर अस्वस्थ झालेली शारदा मनापासून लिहिते, 'ही संस्था पाहिली. मन अस्वस्थ झालं. केवढं तरी कार्यक्षेत्र ओसाड वाळवंटासारखं माझ्याकडे पाहात आहे असं वाटतं. तेथील निष्पाप, गोंडस मुली, त्यांचे बावरलेले चेहरे पाहताना त्यांच्या पोरकेपणाबद्दल मलाच अपराधी असल्यासारखं वाटत होतं. या मुलांसाठी आपलं आयुष्य कारणी लावणाऱ्या ख्रिचन सिस्टर्सचं कौतुक वाटलं. या छोटया मुला-मुलींनी बनवलेल्या वस्तू पाहून स्वतःमधील उणीव जाणवली. यांच्यासाठी मी काय करू शकते हे प्रश्नचिन्ह बरोबर घेऊन मी त्या संस्थेतून बाहेर पडले.

नंतर महिला सेवाग्राम. तेथील दुःख मन हलवून सोडणारंच. कुमारी मातांचं दुःख त्यांच्या पडत्या पापण्यातून डोकावताना आम्ही पाहिले. अशांचं जीवन पुनः फुलविण्याचे प्रयत्न करणारी ही संस्था. ती अनाथ व पोरकी मुलं. कोणाचा अपराध आणि कोणाला शिक्षा? हृदयात कोलाहल माजला. हे असं का? परमेश्वरानं तरी या मुलांना जन्माला का घातलं? का का का? मी काय करू शकते याचा विचार करत जड पायांनी परतले आहे.'

ह्या आणि अशा प्रकारच्या मुक्त चिंतनामधून, लहान लहान गटांमधील चर्चांमधून वर्गांचं स्वरूप काही वेगळंच निर्माण झालं होतं. वैचारिक चर्चांबरोबरच लहान सहान गोष्टीबाबतही शिस्त, स्वावलंबन, प्रामाणिकपणा स्वतःच्या जबाबदारीची जाणीव या गोष्टी किंचित का होईना पण अंगवळणी पडत होत्या. रोजच्या व्याख्यानांच्या वेळी अध्यक्षही एक मुलगीच न् आभारप्रदर्शन करणारीही एक मुलगीच असेल अशी योजना होती. मुलींसाठी आवश्यक अशी स्टेशनरी, कार्डे, पाकिटं वगैरे एका ठिकाणी व्यवस्थित ठेवून भिंतीवर प्रत्येकी किंमतीचा तक्ता लावलेला होता. प्रत्येकीनं पाहिजे ती वस्तू घ्यायची व त्या तक्त्यातील किंमती-

पृष्ठ ४७ वर

# कविता

## कृतज्ञ

नको स्वप्नांचा संभार
नको रंगाचे वादळ
ओल्या हळव्या क्षणाला—
नको पापणीत जळ . .

नको शिळ्या गंधवेण्या
ढळो स्मृतींचे मनोरे...
शब्दांचेच दिले मन–
आता एवढेच पुरे... !

–विनायक साने

## दिवस

एक दिवस काळा
एक दिवस निळा
एक दिवस अंतर्यामी
लवलवणाऱ्या ज्वाळा

एक दिवस धारांचा
एक दिवस मोराचा
एक दिवस भाळावरती
सौभाग्याचा टिळा

एक दिवस पोटाचा
एक दिवस ओठाचा
एक दिवस हसतानाही
सोसायच्या कळा

एक दिवस प्रीतीचा
एक दिवस भीतीचा
एक दिवस देवाजीचा
हिरवा हिरवा मळा !

–विनायक साने

## तू आणि मी

थोडंसं उन्ह उतरताना
अलीकडे इतक्यात पलीकडे
पंख झेपावत आलेली सकाळ
कोवळी, जशी तुझी आठवण
हळूहळू झाडावर भीडताना
सकाळवारा, तुझा श्वास
  झाडांच्या शेंड्यावर घरंगळत्या
  उन्हात उसळत पार
  दंहीवरातून पान्यात
फुलांचे काफिले
पाखरांच्या थव्यातून
थोडंसं उन्ह उतरताना
अलीकडे इतक्यात पलीकडे
पंख झेपावत आली सकाळ
जशी तू !
आणि मी ?
  भल्या पहाटे
  उन्हातून उन्हाचे उन्ह
  भोगताना क्षितिजा पल्याड

प्रतिभा जोशी

'कृतज्ञ' या दोन कडव्यांच्या कवितेत विनायक साने यांनी एका तृप्त मनाचे वर्णन केले आहे. शब्दांचा ठेवा लाभलेले हे कविमन स्वतःशीच तृप्त आहे. त्यामुळे त्याला अन्य कशाचीच अपेक्षा नाही. नको असलेल्या बाकीच्या गोष्टींमध्ये स्वप्नांचा संभार आणि रंगाचे बादळ यासारख्या काव्यमय अनुभूतीप्रमाणेच हळव्या क्षणी पापणीत ओलावणाऱ्या जळाचाही समावेश आहे. 'शिळचा गंधवेण्या'च्या उल्लेखाने या सगळ्याच भावार्थाला प्रेमानुभवाचे परिमाण लाभते. प्रीतीच्या केवळ शब्दांतच तृप्त असणाऱ्या मनाला, आता स्मृतीचे मनोरे ढळले तरी त्याची पर्वा नाही. नेमके भावरेखीव शब्द असतील तर छोट्या विस्ताराची कविता किती मोठा आशय साधू शकते याचे ही कविता म्हणजे उत्तम उदाहरण आहे.

विनायक साने यांनी 'दिवस' या कवितेत संसाराच्या अनुभवाचे बहुकेंद्री स्वरूप सांगितले आहे. प्रासावर्तनाचा एक चांगला ठेका या कवितेला लाभला आहे. संसाराचे स्वरूप विविधरंगी असते, म्हणून दिवसांचे वेगवेगळे प्रकार. हे दिवस 'काळा-निळा' अशा विविध रंगांचे, 'धारांचा-मोराचा' अशा कार्यकारण-धुंदीचे, 'पोटाचा-ओठाचा' अशा देहवृत्तीचे व 'प्रीतीचा-भीतीचा' अशा भाववृत्तींचे असतात. अंतर्यामीच्या लवलवणाऱ्या ज्वाळा, भाळावरचा सौभाग्याचा टिळा, हसतानाही सोसायच्या कळा, देवाजीचा हिरवा-हिरवा मळा या विविध प्रतिक्रियात्मक भावप्रवृत्ती. मनातल्या मनात सोसावयाची धग, अमाप लाभलेले भाग्य, उदात्त वृत्ती यांचे प्रतिकात्मक वर्णन त्यातून होत राहते.

निसर्ग आणि कवयित्रीचे भावपूर्ण मन यांचे एकरूप दर्शन कु. प्रतिभा जोशी यांच्या कवितेत होते. निसर्गाचे रमणीय प्रतिबिंब कवयित्रीच्या संवेदनात पडलेले आहे आणि उलट निसर्गही कवयित्रीच्या भावनांनी रंगून निघाला आहे; सजीव बनला आहे. हा बिंबप्रतिबिंब भाव मोठा मनोहर आहे. प्रियकराच्या आठवणी-प्रमाणे पंख झेपावत आलेली सकाळ, त्याच्या श्वासाप्रमाणे हळूहळू झाडावर भिडणारा सकाळवारा वगैरे उपमादृश्ये त्यामुळे संवेदनांचा भावगहिरा प्रत्यय देतात. कवयित्रीचे सौंदर्यलक्ष्मी चित्रमय निरीक्षण दुसऱ्या कडव्यात मोहक वाटते. 'भल्या पहाटे उन्हातून उन्हाचे उन्ह भोगताना क्षितिजा पल्याड' या स्वात्मदर्शनात कितीतरी अर्थसंवेदना एकत्र आल्या आहेत आणि संवेदनांच्या पलीकडच्या अवस्थेला साकार करीत आहेत.

— रसिक



"झालं का बेटी तुझं ? चल लौकर. उशीर होईल !" आरशात पाहून छाती-वरती पदकं लावत आबा सुनेला बोलवत होते. सरिता एकेक पायरी शांतपणे उतरत माडीवरून खाली आली. आबा तिच्याकडे पाहात राह्यले. कळत न कळत त्यांच्या कपाळावर आठी उमटली. पण आपली नाखुषी त्यांनी तिच्या-पासून दडवली. तिनं रेशमी साडी नेसायला नको होती; आणि कपाळावर कुंकवाची काळी टिकलीही लावायला नको होती. पती मेलेल्या स्त्रीनं कसं साधं राह्यला हवं.

नटणं, मुरडणं असायला नको आणि शिवाय आपल्याकडे विधवेनं कुंकू लावायची पद्धतही नाही. अर्थात सरितेची काहीच चूक नव्हती. विधवेनं दिसायला नको इतकी सुंदर ती दिसत होती. आज जवळ जवळ दोन महिन्यांनी ती घराबाहेर पडणार होती. 'सागर' युद्धात धारातीर्थी पडला ती बातमी ऐकल्यापासून तिनं जगाचे दरवाजे आपल्यासाठी बंद करून घेतले होते. आज तिला नाईलाजानं सागराविना वैराण भासणाऱ्या जगात जावं लागणार होतं. अनेक पराक्रमी सुपुत्रांना राष्ट्रपतींच्या हस्ते मानचिन्हं देण्याचा समारंभ आज होणार होता. सागरला परमवीरचक्र जाहीर केलं होतं. आज राष्ट्रपतींकडून त्याचा स्वीकार करायचा होता. सागरची पत्नी म्हणून सरितेला हा बहुमान मिळत होता. पराक्रमी वीराची पत्नी होणं एखादीच्याच नशिबात. वैधव्याचं दुःख आणि कोसळणाऱ्या अश्रूधारा कशाबशा दावत ती निघाली होती. सागरला आवडणारी ती सिल्कची पांढरी साडी तिनं नेसली होती. ही साडी नेसली की, सागरसारख्या वैमानिकालाही काव्य सुचायचं, म्हणायचा, "स्वप्नातली परीराणी वाट चुकून आली पृथ्वीवर. पंख नाही सापडत म्हणून पृथ्वीवर राह्यलीय इथं. थाटलाय संसार माझ्यासारख्या वैमानिकाबरोबर वेडया आशेने की, देईन निरोप इंद्राला पाठवून दे नवीन पंख आमच्या परीराणीला, वेडी परीराणी..." आणि धुंद मिठीत घ्यायचा कधी न सोडण्यासाठी.

आरशासमोर उभं राहून तिनं स्वतःच प्रतिबिंब न्याहाळलं. गळा कसा ओका ओका दिसत होता. तिनं कपाटातली सोन्याची चेन काढली. गळ्यात घातली. साखळी बरोबर सागरच्या अनेक आठवणी भोवती घोटाळायला लागल्या...ती स्वप्नं...त्या आशा...ती वचनं...

'चला ! निघू या !' आबा म्हणाले. तिनं डोक्यावरून पदर घेतला. आबांना वाकून नमस्कार केला. लष्करी अधिकाऱ्यांनी रडायचं नसतं, आबांनी रुमालाने अश्रू दडवले. काय आशिर्वाद द्यायचा ?...आबांनी तिच्या पाठीवरून हात फिरवला...त्यात ममता होती आणि आधाराचा दिलासा होता... 'चल !

## जयंत जोशी

उशीर होईल...' बाहेर गाडी उभी होती. सरकारी गाडी न्यायला आली होती. आबा आणि सरिता बसले...

सभागृह खच्चून भरलं होतं. अनेक लष्करी अधिकारी, त्यांचे कुटुंबीय, मंत्री, खासदार आणि सामान्यांपासून असामान्यांपर्यंत सर्व थरातले, सर्व व्यवसायातले छोटे मोठे लोक उपस्थित होते. इतके लोक असूनही वातावरणात कुठं गडबड नव्हती, गोंधळ नव्हता. वेगळया प्रकारचं गांभीर्य सगळीकडं भरलं होतं. याच

जागेत आबांना पाच-सात वर्षांपूर्वी वीरचक्र मिळालं होतं. आबांना त्याची आठवण झाली. स्वत: घेतलं होतं. कृतार्थतेचं समाधान त्या वेळी आबांना मिळालं होतं. मोठ्या आवेशात आबांनी भाषण केलं होतं, "आज मी लष्कराच्या सेवेतून निवृत्त होतोय [खरा, पण माझा मुलगा मी देशाला अर्पण करतोय." आबांचा आत्मविश्वास खरा ठरला होता. पोराला श्रद्धांजली वहायची पाळी वडिलांवर आली. सागरनंही मानचक्र मिळवलं – परमवीर चक्र. आबांचा ऊर भरून आला. त्यांनी स्वत:च्या छातीवरची पदकं कुरवाळली – अभिमानानं. त्यांना आनंद होत होता. त्याला दु:खाची कड होती आणि त्यांच्या दु:खाला आनंदाची झालर...

"ऐ मेरे वतनके लोगो। जरा आँखमें भरलो पानी।
जो शहीद हुये है उनकी। जरा याद करो कुर्बानी॥"

लताच्या दर्दभरी आवाजानं वातावरणाच्या गांभीर्यात भर टाकली...

कार्यक्रमाला सुरुवात झाली....शहीदांना श्रद्धांजली...पराक्रमाचं कौतुक...मागं राह्यलेल्यांचं सांत्वन...सहानुभूती...अभिमान...मानचिन्हं देण्याचा कार्यक्रम. अनेक जखमी जवान स्टेजवर येऊन बक्षीस घेऊन गेले...कुणाला स्ट्रेचरवरून आणलं...त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचं तेज विलसत होतं...कुणी वीरमाता थरथरत्या हातांनी मुलाला मिळालेल्या सन्मानाचा स्वीकार करत होत्या... सागरचं नाव पुकारलं....सागर येणार नव्हताच. त्यानाही माहीत होतं. सागरची पत्नी सरिता, एक एक पाऊल ओढत स्टेजवर आली. राष्ट्रपतींकडून तो बहुमान स्वीकारला. ते मेडल उराशी धरून तिनं खाली पाह्यलं. आबा डोळे पुसत होते... साखळी तुटली...पराक्रमाची साखळी तुटली...आबांना त्याचीच खंत वाटत होती...घेतलेलं व्रत...अग्निहोत्र थांबणार. परमेश्वरा थोडी घाई केलीस. निदान पराक्रमी नातू देऊन तरी...

...मनातलं वादळ मनात दाबत सरिता स्टेजवरून खाली आली. थेट आबांकडं. "आबा चला घरी जाऊ. सहन होत नाही आबा.. चला आबा" सरितानं विनवलं. आबांना तरी कुठं शक्ती राह्यली होती. त्यांच्या मनाची कोंडी झाली होती. आबा आणि सरिता बाहेर पडले...पुढची नावं पुकारली जात होती... अनेक सरिता एकामागून एक स्टेजवर येत होत्या. पतीच्या पराक्रमाची पावती न्यायला...थरथरते हात...कापरा श्वास...उरातलं दु:ख...सारं एका दावत नव्या जबाबदारीचे आश्वासन देत...

आबांना जपायला हवं. ब्लडप्रेशर आहे. भयानक दु:ख किंवा खूप आनंद त्यांना धोक्याचाच. अंगावर लष्करी कपड्याचं कवच पांघरून आबा आता वावरत होते. सामान्य माणसाचं हळवं हृदय जगाला दिसू नये म्हणून धडपडत होते. त्यांचे करारी डोळे उगीचच पाझरायचे. छातीवरती मेडल्सची रांग लाऊन छातीतून येणाऱ्या वेदना दाबायचे. पांढऱ्याफटक कपाळाच्या सरितेकडं पाह्यलं, की गलबलून

यायचं. काय लिहिलंय पोरीच्या नशिबात. पांढरं फटक कपाळ...फुटकी पाटी आबांनी विचार केला, आयुष्यभर पोरीनं असंच का जगायचं? किती आयुष्य आहे कोण जाणे? आज मी आहे तोवर काळजी नाही. मी गेल्यावर उद्याचं काय? आबांनी निर्णय घेतला. आपल्यासमोर पोरीचं लग्न करायचं. तिच्या पांढऱ्या फटक कपाळावर कुंकवाचा टिळा लावायचा. हिरवा चुडा भरायचा. कन्यादानाचं पुण्य घ्यायचं. घाई करायला हवी. उद्याचा भरंवसा नाही. डोळ्यासमोर उभा राह्यला शेखर देसाई. सागरचा मित्र. सरिताला ओळखतो. अजून लग्न झालं नाही त्याचं. आपल्या शब्दाबाहेर शेखर जाणार नाही; याची आबांना खात्री होती. सरितासारखी सुंदर, विचारी पत्नी मिळायला भाग्य लागतं.

आबा शेखरकडं गेले. त्याला सगळी परिस्थिती सांगितली. शेखरनेही कर्तव्य जाणून होकार दिला. मग आबांनी घाई केली. रजिस्टर विवाहाची तारीख ठरवूनच ते घरी आले. सरिताला काय काय विचारायचं. तिला फक्त सांगायचं. आज्ञा देणं येवढंच आबांच्यातल्या लष्करी माणसाला कळत होतं.

सरिताला हा निर्णय कसा सांगितला ते आबांनाच ठाऊक. सागरची शपथ घालून तिला होकार द्यायला लावला. आयुष्य अजून खूप आहे याची तिला जाणीव करून दिली. शरीर आणि मन-वासना यांचं अस्तित्व विसरून चालणार नाही हे समजावलं. प्रचंड संघर्षात उभ्या असलेल्या मनानं शेवटी होकाराची बाजू घेतली. आबांना समाधान वाटलं. पोरगी समजूतदार आहे. आता फक्त लग्न-करायचं येवढंच राह्यलय. निदान पोरीचं विस्कटलेलं जीवन तरी व्यवस्थित होईल. आता केव्हाही मरण आलं तरी निश्चितपणे मरता तरी येईल. मनात टोचत तरी राहणार नाही......

सरिता शेखरला भेटून संध्याकाळी आली ते प्रचंड मानसिक आंदोलन बरोबर घेऊन. तिनं आबांना सांगितलं, " आबा शेखर माझ्याशी लग्न करणार आहे. माझा स्वीकार करणार आहे. फक्त माझाच. माझ्या सागरच्या मुलाचा नाही–केवळ माझाच. " आबांच्या लक्षात आलं.. संतापले, " मग तू अगोदर का सांगितलं नाहीस. मी हा विषयदेखील काढला नसता. आता तुला जपलं पाह्यजे. माझ्या सागरचा गर्भ तुझ्या पोटी आहे. तो जपला पहिजे...पराक्रमी सूर्याचा मुलगा... माझ्या सूर्याचा पुत्र तुझ्या पोटी आहे......" आबा खूप काही बोलत होते. सरिताच्या मनात वादळ उसळलं होतं. तिचं जीवन उध्वस्त करायला निघालं होतं. हॅम्लेटच्या 'टु बी ऑर नॉट् टुबी' पेक्षाही भयानक...पोटी सूर्याचा गर्भ वाढतोय· तो नाहीसा करायचा आणि स्वतःचा नवा संसार थाटायचा ही कल्पना दाहक होती. जगाच्या बाजारात घृणा निर्माण करणारी होती. त्याच गर्भात आयुष्याची सारी स्वप्ने पाह्यची, साकार करायची. एक आई–एक वीरपत्नी हे सारं ठरवत होती आणि दुसरं मन होतं एका स्त्रीचं–तरूण मुलीचं. जीवनाची गोडी थोडीशी

चाखलेल्या आणि हातून ग्लास कलंडून गेलेल्या, मुकेल्या तरुणीचं शरीरात असलेलं मन विचार करत होतं–' गेलेल्या माणसाच्या स्मृती जपत आयुष्याचा वणवा करायचा ? कुणाच्या तरी गर्भात स्वतःची स्वप्नं पाहात राह्यचं. स्वतःच्या जीवनाचं कुणासाठी तरी वाळवंट बनवायचं ? कुणाची तरी विधवा म्हणून जगायचं ? ...कर्तव्य–भावना–व्यवहार–वासना यांच्यातला संघर्ष तिच्या मनात चालला होता. आबा हे सारं पाहात होते. त्यांना खात्री होती सरिता निर्णय घेईल तो योग्यच असेल. सरिता आणि सागर यांचं नातं अतूट आहे. सरितेनं सागरच्या आकांक्षेचा ठेवा जपायचा नाही तर कसला ?...साखळी तुटली नाही...यज्ञ चालू राहणार...अग्निहोमाचं घेतलं व्रत पूर्ण होणार...सागरचं निशाण पडणार नाही. ...नवा शिलेदार ते पकडून ठेवेल...आबा नव्या शिलेदाराची वाट पाहात होते.

सरितानं बाहेर जायची तयारी केली...लग्न नुकतंच झालं होतं त्या वेळची गोष्ट. सागर म्हणाला, ' बायकोचं कुंकू जितकं मोठं तितकी नवऱ्याच्या आयुष्याची दोरी बळकट '...त्या वेळी सरितानं उत्तर दिलं होतं, ' असं असेल तर मी कपाळ-



भर मळवट भरेन '...त्यानंतर लवकरच सागरला युद्धावर जावं लागलं होतं. रोज आरशात बघून रुपयायेवढं मोठं कुंकू लावायची सरिता...एक दिवस बातमी आली आणि कुंकू पुसलं...रुपायायेवढं कुंकू स्वतःच्या हातानं पुसलं तेव्हापासून आरशाला पांढरं फटक कपाळ पाह्यची सवय झाली होती. आज कपाळावर कुंकवाची काळी टिकली लावताना सरिताचा हात थरथरत होता. तिची तयारी झाली होती. निळ्या साडीनं तिच्या विधवा सौंदर्यात भर टाकली होती. चेहरा शांत दिसत होता. अंतःकरणातलं वादळ शमलेलं होतं.

"आबा मी बाहेर जाते...यायला उशीर होईल." 'ठीक आहे' पेशन्सचा डाव मांडता मांडता आबांनी अनुमती दिली. आबांनी मान वर करून बघावं, कुठं चाललीस ? असं विचारावं अशी तिची इच्छा होती. पण आबा शांत होते. 'आता कुठंही गेली तरी ती परत घरीच येणार...तिला माझ्या सागराचा ठेवा सांभाळायचाय...' आबांना विश्वास वाटत होता. सरितानं सागरच्या फोटोला नमस्कार केला. आबांनाही नमस्कार केला. "पोरी घेतला निर्णय बदलू नकोस. योग्य निर्णय घेतीयस पोरी...निर्णय बदलू नकोस...त्यातच तुझं भलं आहे..." आबांनी आशिर्वाद दिला.

"आबा मला भीती वाटतेय..." सरिता कातरलेल्या आवाजात म्हणाली.

"डोन्ट वरी माय डियर..." आबांनी धीर दिला.

सरितानं टॅक्सीला हात केला. टॅक्सीत बसून 'पोस्ट ऑफीस..' तिनं ड्रायव्हरला सांगितलं. ती आणखीन शांत दिसत होती. मनातलं वादळ शमलं होतं.. पोस्ट ऑफीसपाशी उतरली. डॉ. खानोलकरांच्या दवाखान्यात शिरली. "डॉक्टर माझं अॅबॉर्शन करायचंय. तिसरा महिना आहे. डॉक्टर प्लीज...बी क्वीक डॉक्टर..." सरिता.

......आबांचा पेशन्सचा डाव रंगात आलाय. ट्रिंग...ट्रिंग...फोनची बेल... "मी डॉक्टर खानोलकर...सरिता आलीय...अॅबॉर्शन करायचं म्हणतीय...बट् इटस् व्हेरी रिस्की ऑपरेशन्.. तिसरा महिना आहे..." डॉक्टर काहीसं बोलत होते. आबांच्या छातीतून कळ आली...छातीवर हात दाबत, "प्लीज डॉक्टर यू मस्ट...इफ् शी सेज्...यू वील गेट सक्सेस्.. प्लीज . बेस्ट ऑफ् लक...आय विल् रीच् देअर..." फोन ठेवला. मनाचा दगड केला. शरीर घामानं डबडबलं होतं... साखळी तुटणार...कोवळा अंकूर खुडला जाणार . सूर्याचा गर्भ चिरला जाणार...

आबांचं ब्लडप्रेशर वाढायला लागलं...काय करतोय ते त्यांच्या लक्षात येईना. त्यांनी भराभरा कपाटातला लष्करी वेष अंगावर चढवला...ती मेडल्स...ते पॉलीश्ड शूज...कुठं तरी मोहिमेवर निघालेत जणू...दारात आले. बाहेरून टक्-टक्. दार वाजलं. बाहेर कॅप्टन शेखर देसाई उभा. त्यानं सॅल्यूट ठोकला...कन्यादान...भावी जावई ..

' कर्नलसाहेब कुठं बाहेर निघालात ?' शेखरनं विचारलं.

" येस् कॅप्टन...एका योद्धयाला मानवंदना द्यायला निघालोय. तुही चल कॅप्टन ...अशी संधी कधी येत नाही...योद्धयाला सलामी...अखेरची सलामी." आबांच्या बोलण्यात कडवटपणा येत होता.

"कोण तो योद्धा ? नाव काय !"

" अजून नाव ठेवलं नव्हतं...' अनामिक ' म्हणू...नाहीतरी नाव ठेवून करायचं काय ?...त्याचं अस्तित्व कुठं होतं अजून जगात "...

—आबांना तोल सांभाळता येत नव्हता.

" सरिता आहे ? तिला सांगायला आलोय. माझी वाट पाहू नकोस. इमर्जन्सी ऑर्डर आलीय . बॉर्डरवर चाललोय...वॉर सुरू झालंय...परहॅप्स आय् विल् नॉट कम् बॅक्...प्लीज एक्स्क्यूज् मी...आबा तिचं दुसऱ्या कुणाशी तरी लग्न करा.. माफ करा..."

शेखर एका दमात बोलला...

" विश् यू ग्रेट सक्सेस्...माय डियर.. गुडलक् कॅप्टन " अभावीनपणे आबांच्या तोडून शब्द बाहेर पडले...

कॅप्टन शेखर एरोड्रमच्या दिशेनं निघून गेला. आबांचे डोळे चकाकले. आबा धावत धावत फोनपाशी गेले....भराभरा डायल फिरवली...सांगायचं होतं... ' स्टॉप दि नॉन्सेन्स. ऑपरेशन करायचं नाही...साखळी तुटू द्यायची नाही '... डॉक्टर खानोलकर, कर्नल शिंदे स्पीकींग...येस् कर्नल्...कॉंग्रॅच्युलेशन्स...ऑपरेशन सक्सेसफुल...ॲबॉर्शन सक्सेस्फुल...डॉक्टर आभाळ कोसळलंय...आभाळ कोसळ-लंय.. देन् किल हर् ऑल्सो...किल् हर ऑल्सो..." फोन खाली ठेवला आणि आबांनी कपाटातलं पिस्तूल बाहेर काढलं......



# पुस्तके

## ॥ टेम्सच्या लाल लहरी ॥


**डॉ. सौ. कुसुम कुलकर्णी**

'टेम्सच्या लाल लहरी' ही उषा परांडे यांची पहिलीच कादंबरी असूनही अभिनव अशी कथा आणि पार्श्वभूमी यामुळे ती लक्षणीय झाली आहे. इंग्लंडमधील ऐतिहासिक वातावरण आणि घडामोडी त्यांनी या कादंबरीत वर्णिल्या आहेत. दुसऱ्या एडवर्डची पत्नी इसाबेला हिची नाटयपूर्ण जीवनकहाणी त्यांनी येथे ग्रथित केली आहे. या महत्त्वाकांक्षी, कर्तृत्वसंपन्न स्त्रीचे आयुष्य अनेक विस्मयकारक, रोमांचकारी घटनांनी भरलेले होते. तिच्या राजकारणी जीवनात तसेच खाजगी जीवनातही अनेक उलथापालथी, आघात-प्रत्याघात यांच्या लहरी उसळत होत्या. त्यांचे मोठे रंगतदार चित्रण उषा परांडे यांनी केले आहे.

इसाबेला ही फ्रान्सची राजकन्या पण तिचा विवाह राजकारणासाठी इंग्लंडच्या राजाशी केला जातो. येथपासूनच तिच्या जीवन-संघर्षाला प्रारंभ होतो. पति-पत्नींच्या मनाचा संवाद साधलेला नसतोच. त्यातच पतीची स्वार्थी सहकाऱ्यांच्या साह्याने चाललेली जुलमी राजवट तिला मुळीच पसंत नसते. याला विरोध दर्शविल्याबरोबर तिच्या पदरी अवमान आणि नजरकैद येते. पण माहेरी गेल्यावर याविरुद्ध झगडण्याचा ती निकराचा प्रयत्न करते. मॉर्टिमरच्या साह्याने जनतेच्या असंतोषाचा फायदा घेऊन एडवर्डविरुद्ध बंड करून ती सत्ता काबीज करते. यावेळ-पर्यंत मॉर्टिमर हा तिचा केवळ साहायक न राहता प्रियकरही बनतो. इसाबेलाने सत्ता हाती घेतली तरी दुर्दैवाने तिच्या राजवटीतही परिस्थितीबाबत जनतेला फारसा फरक जाणवत नाही. इंग्लंडला अपमानकारक असे तह घडतात; त्यामुळे जनता परत बिथरू लागते. यावेळी मॉर्टिमर विशेष सावधगिरी बाळगतो आणि एडवर्डच्या साह्याने सरदार उठाव करतील या धास्तीने नजरकैदेतील एडवर्डचा खून करवितो. या घटनेने मात्र इसाबेला हादरते. तिचे प्रेम मॉर्टिमरवर होते, तसेच पतीसंबंधी तिला तिरस्कार वाटत होता हे खरे असले तरीही आपले अनैतिक संबंध

# यौवनलतिके, तू किती सुंदर आहेस!

तारुण्यपीटिकांमुळे तुला कोणताही
न्यूनगंड बाळगण्याचं कारण नाही.
पुटकुळ्यांवर योग्य उपचार



# नितल

औषधियुक्त पिंपल क्रीम


पुटकुळ्यांवर गुणकारी, व्हिटॅमिन 'एफ' युक्त औषधी क्रीम. आल्हाददायी सुगंध, पुटकुळ्यावर संपूर्ण आणि त्वरित इलाज.

व्हिटॅमिन '**एफ**' पुटकुळ्यांचे डाग नाहीसे करून त्वचा मुलायम आणि सतेज बनविते.

उत्पादक :
**कोचीन पाम प्रायव्हेट लि.**
मुंबई २६. कोचीन २.

वितरक :
**युनि-डिस्ट्रिब्यूटर्स प्रायव्हेट लि.**
मुंबई २६. कोचीन २.

सर्व प्रमुख औषध विक्रेत्याकडे मिळते.



3 BROTHERS/MAR

तिला यावेळी खटकतात. अनुकंपनीय अवस्थेत पतीचा अशा प्रकारे झालेला शेवट तिला बोचतो; हे लेखकिने कौशल्याने दाखविले आहे. इसाबेला मॉर्टिमर यांच्याबद्दल प्रथम आदर बाळगणारा, आईची कीव करणारा युवराज त्यांच्याबद्दल यानंतर अढी बाळगू लागतो; इतकेच नव्हे तर हाती सत्ता घेतल्यावर राज्यलोभासाठी एडवर्डचा खून करणाऱ्या मॉर्टिमरला देहान्त शासन देतो. ज्या पुत्राला एकेकाळी प्रतीला बाजूला सारून इसाबेलाने राज्याभिषेक करविला, त्याच्याच नजरकैदेत अखेरीस राहण्याची तिच्यावर पाळी येते हा केवढा दैवदुर्विलास! इसाबेलाचे हे जीवननाटच वाचकाच्या मनात विविध संमिश्र भावनांच्या लहरी निर्माण करते.

## परकीय असूनही परकीय नाही

या कादंबरीतील ऐतिहासिक कथानक, व्यक्ती आणि वातावरण परकीय असूनही ही कादंबरी मात्र आपल्याला परकी वाटत नाही. येथील राजकारणाचे चित्र सगळीकडे पहायला मिळणारेच आहे हे याचे एक कारण. लढाया, बंड, उठाव, विरोधी पक्षांचे शह, काटशह, खुनाची कारस्थाने, फंदफितुरी यांनी गजबजलेले हे राजकारण आपल्याला परिचित वाटते. यापेक्षाही महत्त्वाचे कारण म्हणजे येथील मानवी भावभावनांचा संघर्ष, विकारविचारांची आंदोलने ही तर सार्वजनिक आणि सार्वकालीन आहेत. वरवर दूरवरचे वाटणारे हे वातावरण, लांबच्या भासणाऱ्या या व्यक्ती, मानवी भावनांच्या या अतूट धाग्यांनी अगदी निकटच्या भासू लागतात. ब्रिटिश सैनिकांविरुद्ध स्कॉटिश सैन्याने जय मिळविला. त्याचे रहस्य लेखक सांगतो; 'सैनिक केवळ शस्त्रास्त्रांनी लढत नाहीत; त्यांच्या मनात जिद्द हवी. खरं तर त्यांची मनंच लढत असतात.'—पृथ्वीवरच्या कोणत्याही युद्धाला लागू पडणारे सार्वकालिक सत्य नाही का हे? यापेक्षाही जेव्हा राजकारणातील आंदोलनांनी, घटनांनी व्यक्तींची मने हादरतात, भावनांना धक्के बसतात, अशा प्रसंगीचे मानवी अंतरंगाचे या कादंबरीतील दर्शन आपल्याला खिळवून ठेवते. इसाबेलाच्या अंतःकरणाचीच उलघाल पहा ना. प्रथम पतीचा प्रियकराने करविलेला खून आणि नंतर प्रत्यक्ष पुत्रानेच प्रियकराला दिलेली फाशी, यांचे जबरदस्त आघात तिच्यावर होतात. राजकारणात अपरिहार्य ठरणारे हे शेवट तिच्या काळजाचे लचके तोडतात. तिचे स्त्रीहृदय तळमळते, टेम्सच्या लाल लहरीतील या उंच उंच उसळत्या लाटा आपल्याला चक्रावून सोडतात.

एडवर्डची तुरुंगातील दीनवाणी अवस्था, मॉर्टिमरची अटकेनंतर व फाशी जाण्यापूर्वीची उलघाल, युवराजांना राज्याभिषेकसमयी पित्याच्या आशीर्वादांची जाणवणारी उणीव, त्यांची मातेबद्दलची वाढती कटुता उलट फिलीपाची माणुसकीच्या, कारुण्याच्या भाराने लवलेली मृदुता हे या टेम्समधील भोवरेही मनोवेधक आहेत. ऐतिहासिक व्यक्तींचे राजकीय जीवन, सार्वजनिक जीवन उलाढालीने भरलेले


पृष्ठ ४६ वर

# फिडेल चे आणि क्रांती

अल्जेरिया-दि-पियोच्या शेताजवळ बंडखोर पोचले तेव्हा एक पाऊलही पुढे टाकण्याचे त्राण त्यांच्यात नव्हते. आठ-दहा पावलं टाकायची आणि विश्रांतीसाठी जमिनीवर अंग टाकायचे अशा केविलवाण्या अवस्थेत ते तिथे पोचले होते. सशस्त्र उठाव करण्यासाठी म्हणून मेक्सिकोहून बोटीतून आलेल्या बंडखोरांची अशी वाताहात झाली होती. हा दिवस होता ५ डिसेंबर १९५६
आणि ते होते बारा—फिडेल धरून.

**अरुण साधू । लेखांक सहा**

सिएरा मेस्त्रा हा दक्षिण क्यूबातील ओरियेन्ते प्रांतातील ईशान्य किनाऱ्यालगतचा प्रचंड पहाडी विभाग. घनदाट जंगलांनी वेढलेले, क्यूबातील सर्वात उंच डोंगर याच विभागात आहेत. सबंध क्यूबाची लोकसंख्या ७५ लाख तर या भागाची अवघी ५० हजार. क्यूबाची संपत्ती, म्हणजे ऊस, तंबाखू आणि कॉफी या भागात अगदी नैसर्गिकरीत्या पिकते. परंतु सारी लोकसंख्या दरिद्री. या भागात धड रस्ते नव्हते, शाळा नव्हत्या, दवाखाने नव्हते आणि डॉक्टरही नव्हते.



फिडेलचे मार्गदर्शन ...... तयारी सुरू झाली.

कोठल्या सरकारी कचेऱ्या नव्हत्या, की कोणी सरकारी अधिकारीही नव्हते. क्रेसेन्शो पेरेझ नावाचा एक राक्षसी शरीराचा शेतकरी हाच तिथला सर्वेसर्वा होता; सल्लागार, डॉक्टर, शिक्षक, न्यायाधीश... सर्व काही.

सिएरा मेस्त्राच्या जंगली पहाडांचे फिडेलला प्रथमपासूनच आकर्षण होते. मोंकाडावरील हल्ला अयशस्वी झाला तर सिएरा मेस्त्रामध्येच माघार घ्यायची आणि तेथून गनिमी युद्ध पुढे चालवायचे अशी तेव्हाच त्याची कल्पना होती. त्याप्रमाणे तो सिएरा मेस्त्राच्या आश्रयाला गेलाही होता. पण पकडला गेला.

आणि योजना फसली.

आताही 'ग्राम्मा'तून उतरल्याबरोबर क्यूबात सर्वत्र उठाव घडवून आणण्याची योजना फसली होती. पण आश्रयासाठी सिएरा मेस्त्रा होते, आणि लढण्याची जिद्द होती.

पाच डिसेंबरच्या हल्ल्यामध्ये उसाच्या मळ्याला आग लागल्यावर सारे बंडखोर गटागटांनी पांगले. फिडेलच्या गटात फोस्तिनो पेरेझ आणि युनिव्हर्सो सांचेझ हे दोघेच होते. अल्मैडाच्या नेतृत्वाखालील चे गव्हेराच्या गटात एकूण पाच होते. कैमिलो सिनेफ्रुजोच्या गटात दोघे आणि राऊल कास्ट्रोच्या गटात दोघे. बाकीचे ठार झाले.

फिडेल इतर दोघांबरोबर भटकत असताना त्याला एकच काळजी लागून राहिली होती. सर्व गटांना एकत्र करणे. युनिव्हर्सो सांगतो की, त्याला आणि फोस्तिनोला एकच काळजी होती. फिडेलला सांभाळून ठेवणे, त्याला आवरणे, फिडेल अत्यंत धाडसी आणि धडपड्या. कोणत्या क्षणी सैनिकांच्या हाती सापडेल याचा नेम नव्हता. आमची सारी भिस्त फिडेलवर. फिडेल म्हणजे क्रांतीचा अग्रदूत. तो बाटीस्टाला खाली खेचणारच यात शंका नव्हती. त्याला जपणे आवश्यक होते –

बाटीस्टाची विमाने त्या भागात अद्याप घिरट्या घालीतच होती. सैनिकांची खास पथके उसांचे मळे धुंडाळून काढीत होती आणि अशा परिस्थितीत त्या पराभूत बंडखोरांचे गट बेजार अवस्थेत लष्कराला चुकवीत भुतासारखे हिंडत होते. प्रत्येक गटाचे अनुभव दुसऱ्या गटापेक्षा अधिक खडतर, विचित्र, धोक्याचे आणि जिकीरीचे. भूक, तहान आणि डास हे बाटीस्टांच्या विमानाएवढेच शत्रुत्व करीत होते. उसांवर भूक भागवणे, खडकांच्या खबदाडीतले पाणी चाटणे, खेकडे खाणे. सैनिकांशी जीवघेण्या अंतराने झालेली चुकामूक. आणि सतत उंच पहाडाच्या दिशेने चालत राहणे. पाय फाटले तरी.

चे गव्हेरा जवळ दम्यासाठी घशात औषध शिंपडण्याचे जे यंत्र होते त्याने खडकांच्या खबदाडीतले पाणी काढता येत असे. पुढे बंडखोरांनी वेलींच्या पोकळ नळकांड्यांनी खडकातील पाणी शोषून घेण्याचे तंत्र शोधून काढले.

बाटीस्टाचे सैन्य पाठलागावर असतानाही एकाही गटाने शरणागती पत्करली नाही हे विशेष. उलट प्रत्येक गटाने मरेपर्यंत लढण्याच्या, तशाही अवस्थेत शपथा घेतल्या.

गटा गटांचा हळूहळू लहानसहान खेड्यांशी संबंध येत होता. काही ठिकाणचे खेडूत त्यांचे स्वागतही करीत होते. पण त्यांच्यात मिसळणे धोक्याचे होते. कारण सैनिकांना मग त्यांचा सुगावा लागला असता.

युनिव्हर्सो आणि फोस्तिनो यांच्याबरोबर फिडेल एका गुहेसारख्या खबदाडीत

तीन दिवस दडून बसला होता. नंतर लपत छपत बाहेर पडला. पाच-सात दिवसांनी भुकेने जर्जर होऊन ते एका शेतावरील झोपडीत शिरले. तिथे त्यांचे चांगले स्वागत झाले. त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याने फिडेलला ताबडतोब ओळखले आणि खाऊ-पिऊ घातले. फिडेल आणि त्याचे साथीदार बोटीतून येणार आहेत हे त्याला सांगण्यात आले होते. फिडेल जिवंत आहे हे पाहून म्हातारा खूष झाला. काही दिवसांनी त्याचा मुलगा गुलेर्मो गार्शिया हाही दोन बंदुका घेऊन क्रांतीकारकांना सामील झाला.

गुलेर्मोनेच फिडेलची क्रेसेन्शो पेरेझची ओळख करून दिली. क्रेसेन्शोची सहवीस जुलै चळवळीला सहानुभूती होती. ओळख झाल्यावर त्याने फिडेलला सर्व तऱ्हेची मदत करण्याचे आश्वासन दिले. पेरेझ त्याभागात अत्यंत लोकप्रिय होता. त्यामुळे त्याची मदत कास्ट्रोला महत्वाची होती.

## उंच शिखरे दिसली आणि....

सिएरा मेस्त्राच्या जंगलातून तशा अवस्थेत त्या दोघांबरोबर हिंडताना फिडेलची सिएरा मेस्त्राच्या उंच शिखरांकडे नजर गेली. आणि त्याची छाती भरून आली. गनिमी युद्धाचे डावपेच त्याच्या डोक्यात तयार होऊ लागले. युनिव्हर्सो जवळ तो उद्गारला, 'बास-बाटीस्टाचा पराभव आता ठरला–'

युनिव्हर्सोला खरोखरच प्रथम असे वाटले की, फिडेलचे डोकेच फिरले आहे. पण फिडेलचे डोके फिरले नव्हते. तो थंडपणे हिशेब करीत होता. पवित्रे रचीत होता.

क्रेसेन्शोच्या संपर्कात आल्यावर पाच डिसेंबरच्या हल्ल्यातून आणखी काही बंडखोर वाचले असल्याच्या बातम्या त्याच्या कानावर येऊ लागल्या. वाचलेल्यांपैकी एकजण दमेकरी असून त्याच्या मानेला मोठी जखम झाली असल्याचे कळले. फोस्तिनोने त्या धुमश्चक्रीत चे गव्हेराच्या मानेला जखम झाली असल्याचे पाहिले होते. त्यामुळे हा दमेकरी दुसरा तिसरा कोणी नसून 'चे' च असला पाहिजे याची त्यांची खात्री पटली तेव्हा त्यांनी या गटाला बोलावणे पाठवले.

दरम्यान चे च्या गटाची आणि कॅमिलोच्या तुकडीची एका अंधाऱ्या रात्री जंगलात गाठ पडली होती. एकमेकाला शत्रू समजून दोन्ही तुकड्यांनी बंदुका सरसावल्या तेवढ्यात ओळख पटली. नंतर हे दोन्ही गट बरोबरच भटकू लागले. पुढे राऊल कास्ट्रोची बातमी त्यांना लागली. आणि तोही त्यांना येऊन मिळाला.

फिडेल आसपासच भटकतो आहे हे कळल्यावर त्यांना आनंद झाला. पक्की बातमी कळल्यावर आणि खात्री पटल्यावर सगळ्यांची एका पहाडाच्या उतरणीवर गाठ पडली. चारी बाजूने बाटीस्टाने वेढलेल्या जंगलात. सगळ्यांनी एकमेकाला मिठ्या मारल्या. आणि फिडेल म्हणाला, 'चला, आता आपल्या लढ्याला सुरुवात होईल. आपण जिंकणार हे नक्की.'

बहुतेकांच्या बंदुका हरवल्या होत्या. सगळ्या मिळून अवघ्या सात आठ बंदुका

शिल्लक होत्या. काडतुसेही फारशी नव्हती. फिडेलने सगळ्यांना दम भरला. तो म्हणाला, 'आतापर्यंतच्या चुकांपासून तुम्ही अजून काहीच शिकला नाहीत. आपल्या परिस्थितीत हत्यार गमाविण्याच्या चुकीची किंमत तुम्हाला तुमच्या प्राणाने मोजावी लागेल. सैन्याशी मुकाबला झाला तर जीव वाचविण्याचा तुमच्या जवळ आशेचा एकच धागा होता, बंदूक. ती गमावणे महामूर्खपणाचे आहे–"

स्वत:च्या आत्मविश्वासाने आपल्या भोवतालच्या लोकांना उत्तेजित आणि कार्यप्रवण करणे हा मोठ्या नेत्यांचा मुख्य गुण असतो. आत्मविश्वास हे फिडेलचे सर्वात प्रभावी अस्त्र होते. आपल्या विद्युन्मय शक्तीने तो आसपासच्या सर्वांना भारावून टाकी. संकटाच्या क्षणी तर हे प्रकर्षाने जाणवे. चारही बाजूने बाटीस्टाने वेढलेल्या जंगलात अपुऱ्या शस्त्रांनिशी जमलेल्या त्या बारा बंडखोरांच्या तुकडीत पराभवाच्या कडू क्षणीही फिडेलने आत्मविश्वास निर्माण केला. म्हणूनच याच तुकडीतून बाटीस्टाच्या लष्करी यंत्रणेला कोसळविणारे बलिष्ठ बंडखोर सैन्य विकसित होऊ शकले.

एकत्र जमलेल्यांमध्ये होते फिडेल, चे गव्हेरा, राऊल, कॅमिलो, युनिव्हर्सो, फोस्तिनो, अल्मैडा, गार्शिया, मोराल्स, इफिजिन्यो, रेदोन्दो आणि रॉड्रिग्ज्.

सिएरा मेस्त्रामधील सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणजे तेथील सर्वात उंच शिखर पिको तुर्किनो. तिथे बाटीस्टाचे सैनिक येणे शक्य नव्हते. त्यामुळे बारा जणांची ही तुकडी प्रथम ते शिखर चढून गेली. आणि जवळच्या उंची मोजण्याच्या यंत्राच्या सहाय्याने क्यूबन भूगोलांच्या पुस्तकात त्या शिखराची उंची ५० मीटर्सने कमीच दिली असल्याचे त्यावर आढळून आले.

या क्यूबातील सर्वोच्च शिखराच्या परिसरातच बंडखोरांनी आपला पहिला तळ स्थापन केला. फाटक्या कपड्याचे, भुकेने खंगलेले, दाढचा वाढलेले आणि बरोबर पुरेशी शस्त्रेही नसलेले हे भुतासारखे दिसणारे बंडखोर दोन वर्षांच्या आत क्यूबन राजधानी हॅवानामध्ये विजेते म्हणून प्रवेश करतील या गोष्टीवर त्यावेळी कुणाचा विश्वास बसणे शक्य नव्हते.

पहिल्याच दिवसापासून फिडेल आणि त्याच्या साथीदारांनी हालचालींना सुरुवात केली. फिडेलजवळ निश्चित योजना नव्हती. बाटीस्टाचे सरकार उलथून त्या जागी न्यायी, समाजवादी सरकार स्थापन करायचे हे ध्येय होते खरे. ज्या मार्गाने हे शक्य होईल तो मार्ग स्वीकारण्याची तयारी होती.

सध्या त्याला एकच मार्ग दिसत होता. सिएरा मेस्त्रामध्ये बाटीस्टाचे पोलीस आणि सैनिक शिरू शकणार नाहीत व जिथे बंडखोर मुक्तपणे हालचाल करू शकतील असा तळ स्थापन करणे. हळू हळू या तळाची व्याप्ती वाढविणे आणि तसे करताना स्थानिक शेतकऱ्यांना सहानुभूतीने वागवून त्यांना आपल्या बाजूने वळविणे. बाटीस्टाच्या सैनिकी तुकड्यांना एकटे दुकटे गाठून त्यांची शस्त्रे लंपास

करून आपला शस्त्रसंभार वाढविणे, त्याच सुमारास शहरांमध्ये सव्वीस जुलैची चळवळ अधिक तीव्र करणे. सशस्त्र बंडखोरांची ताकद वाढली की ते सैन्याच्या तुकड्यांवर हल्ले करून बाटीस्टाला अधिक बेजार करतील आणि अशा तऱ्हेने बाटीस्टाचे सरकार हळूहळू कोसळण्याच्या बेतास लागेल.

सिएरा मेस्त्राच्या सुरुवातीच्या काळच्या परिस्थितीत त्या बाराजणांनी आपल्या सात बंदुकींच्या आधारावर एवढी महत्त्वाकांक्षी योजना आखणे कोणालाही मूर्खपणाचे वाटले असते. कदाचित त्या वेळी फिडेल आणि साथीदार केवळ जीव वाचविण्या-साठी हा झगडा करीत राहिले असतील. पण त्यांचा झगडा वर सांगितल्याप्रमाणे विकसित होत राहिला खरा आणि दोन वर्षांच्या आत बंडखोरांनी हॅवानात विजयी प्रवेश केला.

स्थानिक लोकांशी प्रेमाने आणि सहानुभूतीने वागून फिडेलने आणि बंडखोरांनी लवकरच त्यांचा विश्वास संपादन केला. बातम्या नेण्याआणण्यासाठी त्यांचा चांगला उपयोग होऊ लागला. हळू हळू शहरातील सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांपर्यंत फिडेलच्या आणि बंडखोरांच्या अस्तित्वाच्या बातम्या जाऊन पोहचल्या. संदेशांची देवाण घेवाण होऊ लागली. शहरांमधून बंदुका आणि माणसे येऊ लागली. पैसे येऊ लागले. याच पैश्यातून बंडखोर स्थानिक लोकांकडून अन्न विकत घेऊ लागले. बंडखोरांसाठी ठिकठिकाणी अन्नाचे साठे करून ठेवण्यात येऊ लागले. त्यामुळे हिंडताना बंडखोरांना बरोबर फारशी ओझी पडत नसत. काही शेतकऱ्यांची मुलेही बंडखोरांना सामील होऊ लागली. परंतु फिडेलचा सक्त नियम होता. बरोबर शस्त्र आणल्याशिवाय कुणालाही बंडखोर सैन्यात दाखल करून घेतले जाणार नाही.

## दोन महिन्यात लढाई सुरू करतो

फिडेलने सिएरा मेस्त्रात राहून आपला जीव धोक्यात घालू नये असे सव्वीस जुलैच्या कार्यकर्त्यांना वाटत होते. त्याने कुठल्यातरी लॅटिन अमेरिकन देशात आश्रय घ्यावा आणि तेथून पुन्हा चळवळीची सूत्रे हलवावी असे त्यांना वाटत होते. फ्रँक पेयस आणि हेडी सान्तामारिया यांनी याबाबत चर्चा केली. फिडेल मरता कामा नये. त्याचा मृत्यू चळवळीला परवडणार नाही यावर दोघांचेही एकमत झाले. आणि फिडेलची समजूत काढण्यासाठी दोघेही सिएरा मेस्त्रात गेले.

फिडेलची अर्थातच या गोष्टीला तयारी नव्हती त्यांनी विषय काढण्याच्या अगोदरच फिडेलने त्यांना सांगितले, 'खाली बाटीस्टाचे सैनिक वाटेत तुम्हांला दिसलेत ना पण वर येण्याची त्यांची हिंमत नाही. मला तुम्ही वीस बंदुका आणि काडतुसं आणून द्या. दोन महिन्यात मी जोरदार लढाई सुरू करतो.' त्या वेळी सिएरामधील बंदुकधाऱ्या बंडखोरांची संख्या होती अवघी अठरा.

सिएरामध्ये क्यूबन बंडखोरांनी गनिमी युद्धाची आपली स्वतंत्र पद्धती निर्माण केली. अर्थात, गनिमी युद्धपद्धती ही नेहमीच त्या त्या ठिकाणच्या भौगोलिक आणि

राजकीय परिस्थितीवर अवलंबून असते. बंडखोरांच्या संख्येवरही ती अवलंबून असते. जीव बचाविण्याच्या उपजत प्रवृत्तीतून ती निर्माण होते आणि अंतिम विजय मिळविण्याच्या ईर्षेने ती विकसित होते. क्यूबन बंडखोरांनी ठेचकाळीत, असंख्य चुकांची प्रायश्चिते भोगीत आणि त्या दुरुस्त करीत, समोर येईल त्या प्रसंगातून मार्ग काढीत आणि त्या पासून धडे घेत युद्धाची एक निश्चित पद्धती बनविली. सिएरा मेस्त्रापूर्वी फिडेलने किंवा चे गव्हेराने माओ वाचला नव्हता. पुढे क्रांतीनंतर त्यांनी माओ वाचला तेव्हा त्यांना कळून आले, की हे आधीच वाचले असते तर आपण बरेच नुकसान वाचवू शकलो असतो. कारण चुका करीत शेवटी आपण त्याच पद्धतीवर येऊन पोचलो. मेक्सिकोमध्ये एक स्पॅनिश कर्नल बायो याने बंडखोरांना गनिमी युद्धाचा श्रीगणेशा दिला होता. पण तिकडे फिडेलला लक्ष द्यायला वेळच कुठे मिळाला होता ?

## तीन मूलतत्त्वे

सिएरा मेस्त्रामध्ये जी गनिमी युद्धपद्धती विकसित झाली तीवर चे गव्हेराने पुढे एक पुस्तक लिहिले. अनेक देशातील तरुण क्रांतिकारकांच्या हाती ते बायबल-सारखे आले. परंतु त्याने सिएरा मेस्त्रातील आपले अनुभव अत्यंत मोजक्या आणि प्रभावी भाषेत एका वेगळ्या पुस्तकात सापेक्षाने लिहून काढले आहेत. या अनु-भवांच्या सुरुवातीला त्याने जी प्रस्तावना लिहिली त्यात त्याने क्रांतीयुद्धावर आपल्या देशात जाण्यासाठी निघालेल्या एका मित्राला तीन वाक्यात सल्ला दिला आहे. या तीन गोष्टी म्हणजे सिएरा मेस्त्रामधील गनिमी युद्धाच्या अनुभवाचे सारच.

ही तीन मूलतत्वे म्हणजे : सततची हालचाल; संपूर्ण अविश्वास आणि कायमचा पहारा.

हालचाल : कधीही एका ठिकाणी थांबू नये; एकाच ठिकाणी दोन रात्री घालवू नये. एका ठिकाणाहून दुसरीकडे अशी हालचाल कधीच थांबवू नये.

अविश्वास : सुरुवातीला स्वतःच्या छायेवरही विश्वास ठेवू नका. स्वतःचा मुक्त भूभाग ताब्यात येईपर्यंत मित्रवत खेडूत, माहिती पुरवणारे, वाटाडे, कॉंटॅक्टस्, कुणा कुणावरही विश्वास टाकून गाफील राहू नका.

पहारा : डोळ्यात तेल घालून सतत जागरूक रहा. आजूबाजूच्या भागाचे बारकाईने निरीक्षण करून ठेवा; सुरक्षित जागीच मुक्काम ठोका आणि सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे छपराखाली कधीही झोपू नका; ज्या घराला वेढा पडू शकेल अशा घरात झोपू नका.

पण हे तीन मूलभूत नियम कास्ट्रो आणि चे यांनी बनविले ते अनुभवांती. त्यांनीही चुका केल्या, त्याची प्रायश्चित्ते भोगली. खेडूतांवर, वाटाड्यांवर विश्वास ठेवायला हरकत नाही, ते प्रेमळ असतात, क्रांतिकारकांना त्यांची सहनुभूती असते.

पण बाटीस्टाच्या सैनिकांनी त्यांना पकडल्यावर आणि त्यांचे हाल केल्यावर ते खेडूत बंडखोरांविषयीची माहिती धडाधडा सांगू लागतात. हे बंडखोरांना एक-दोन चांगले धडे मिळाल्यावरच उमजले. तेव्हापासून सुरक्षित स्थळी पोचेपर्यंत वाटेत भेटलेल्या खेडूतांना पकडून आपल्यावरोबर ठेवणे आणि नंतर सोडून देणे हाच योग्य मार्ग बंडखोरांना वाटू लागला. त्यामुळे धोकाही कमी झाला.

अगदी सुरुवातीला तर वाटाड्यांनीच फसविले. अल्जेरियो-द-पियो च्या सुरक्षित ऊसमळ्यात ज्या वाटाड्यांनी पोचविले तेच नंतर पोलीसांच्या हाती सापडले. आणि जीवे मारण्याचा धाक मिळताच त्यांनी तावडतोब बंडखोरांच्या लपण्याची जागा सांगून टाकली. बाटीस्टाच्या फौजांनी त्या ठिकाणावर बाँबवर्षाव करून तो ऊसमळाच जाळून टाकला. तेव्हापासून एकदा परत गेलेला वाटाड्या किंवा माहिती मिळविण्यासाठी गेलेला बंडखोरसुद्धा ठरलेल्या वेळेत परत आला नाही तर बंडखोर तावडतोब आपले चंबूगबाळे आवरून यःपलायन करीत.

सिएरा मेस्त्राच्या सुरुवातीच्या काळात आजूबाजूच्या खेडूतांशी संबंध टाळणे आवश्यक होते. त्यांच्या नजरेस न पडता हालचाली कराव्या लागत. परंतु पुढे लवकरच बंडखोरांच्या हालचालींनी एक असा मुक्त विभाग निर्माण झाला, की तिथे बाटीस्टाचे सैनिक शिरण्याचे धाडस करीत नसत. बंडखोर खेडुतांशी अत्यंत प्रेमाने वागत आणि त्यांना हरतऱ्हेची मदत करीत. चे गव्हेरासारखे बंडखोरांमधील डॉक्टर त्यांना वैद्यकीय मदत करीत. त्यामुळे हळूहळू बंडखोर आणि ग्रामीण लोक यामधील अंतर कमी झाले. बंडखोरांचे प्रेमाने स्वागत होऊ लागले. आणि मुक्त संचारासाठी बंडखोरांना मोकळे रान मिळाले. सिएरा मेस्त्रा मधील बंडखोरांच्या हालचाली अगदी शिगेला पोचल्या होत्या. त्याकाळात तेथे गेलेल्या एनरीक मेनेझेस या वार्ताहराने बंडखोरांचा दिनक्रम लिहून ठेवला आहे.

## बंडखोरांचा दिनक्रम

–फिडेलबरोबर असलेला आमचा गट एका ठिकाणी कधीच स्थिर नसे. सकाळी सहा वाजता सगळेजण निघण्याच्या तयारीला लागलेले असत. प्रत्येकाची पिशवी बांधून पाठीवर टाकलेली असे. फिडेलने सकाळची पहिली काळी कॉफी घेता घेताच आपली पहिली सिगार पेटविलेली असे आणि त्याच्या हाती त्याची टेलिस्कोपिक रायफलही असे.

रेडियोवरील बातमीपत्र संपले, की फिडेल लांब लांब टांगा टाकीत चालू लागे. त्याच्यावरोबर चालणाऱ्यांना आपण मागे पडू नये म्हणून घाई करावी लागे. अशा तऱ्हेने सर्व दिवसभर आम्ही चालत असू. क्वचित कुठे एखाद्या शेतकऱ्याने खूपच आग्रह केला तर त्याच्या दरिद्री झोपडीपुढे थांबून कॉफी घेण्यासाठी काही मिनिटे आम्ही विश्रांती घेत असू. फिडेल सुरुवातीपासूनच वेगाने चालू लागे. त्यामुळे सकाळी सहापासून संध्याकाळी आठपर्यंत आम्ही खूप अंतर कापलेले असे.

या दिवसभरात आम्ही कितीतरी नद्या पार करीत असू. किंवा एकच नदी वेग-वेगळ्या ठिकाणी कित्येक वेळा पार करीत असू. कोणतीही भौगोलिक अडचण आमचा मार्ग रोखू शकत नसे.

—रात्री जेव्हा आम्ही मुक्काम ठोकत असू, तेव्हा आमच्या बुटातून आपले सुजलेले पाय बाहेर काढणे मोठे जिकीरीचे होई. पहिले काही दिवस रात्री मी पायातून बूट काढीत असे. पण दुसरे दिवशी सकाळी बूट घालताना अक्षरशः रडे येई. मग मात्र मी बूट पायात ठेवूनच झोपू लागलो.

—आमचे अन्न म्हणजे स्थानिक लोक पुरवतील ते धान्य. कधी कधी आम्ही क्यूबातील 'माजा' नावाचे साप मारीत असू. त्याचे मांस हाच आमचा मांसाहार. खरे चांगले मांस दुर्मिळ होते. कधी कधी स्थानिक लोकांकडून विकत घेत असू.

—फिडेलच्या स्थानिक लोकांशी वागण्याच्या योग्य पद्धतीने त्याने आधीच सिएरा मेस्त्रामध्ये मोठा विजय मिळविला होता. एखाद्या खेड्याजवळ पोचल्यावर स्थानिक लोक फिडेलभोवती गोळा होत आणि त्याने आपल्या घरी रहावे, निदान जेवावे तरी असा आग्रह धरीत. क्वचित फिडेल असे निमंत्रण स्वीकारे. पण तेथून निघताना त्या शेतकऱ्याच्या खिशात निदान शंभर पेसोंची तरी नोट कोंबली जाईल याची दक्षता घेई.

— संध्याकाळी मुक्काम ठोकला की राऊल कास्ट्रो आणि रमिरो वाल्दे हे दोघेजण क्रांतिच्या प्रगतीची फिडेलशी चर्चा करीत—कधी कधी आम्ही सर्व शेकोटीच्या भोवती बसत असू. परंतु फिडेल मात्र अस्वस्थपणे मागे हात बांधून येरझाऱ्या घालीत राही आणि तसे करताना आपल्या भविष्यातल्या योजनाबद्दल बोलत राही. त्याचे हे स्वगत म्हणजे उत्कृष्ट भाषणच असे. सर्व बंडखोर आणि त्यांना भेटायला येणारे शेतकरी कानात जीव घालून त्याचा शब्द न् शब्द ऐकून साठवून ठेवीत—नंतरच आम्ही थकून आपापल्या हॅमॉक्स् मध्ये झोपी जात असू——(हॅमॉक म्हणजे दोन झाडांना बांधलेली सतरंजीची झोळी. बंडखोर उघड्यावर झोपणेच पसंत करीत. सिएरा मेस्त्राच्या हवामानात रात्री पावसासारखे दव पडे. त्यापासून बचाव म्हणून वर पोलीथिलीनचे कापड पांघरून बंडखोर झोपत.)

'ग्राम्मा' बोट मेक्सिकोमधून निघाल्यापासून बंडखोरांनी दाढ्या केल्या नव्हत्या. त्यामुळे ज्याच्या त्याच्या दाढ्या आणि केस वाढले होते. पुढे दाढ्या कोणी कापल्या नाहीत कारण कुणाला तेवढा वेळ नसे. त्यामुळे वाढलेल्या दाढ्या हे बंडखोरांचे मोठेच वैशिष्टय झाले. वाढलेली दाढी म्हणजे क्रांतिकारक यांचे पुढे एवढे समीकरण झाले की रजेवर गेलेला बाटीस्टाचा एक सैनिक दाढी वाढवून बराकीत बंदूक घेऊन परत येत असता सांत्यागो शहरात भर दिवसा घाबरून जाऊन पहाऱ्यावरील सैनिकांनी बंडखोर समजून त्याला जागच्याजागीच गोळ्या घालून ठार मारले. बाटीस्टाचे सैनिक बऱ्याच वेळी स्थानिक शेतकऱ्यांना ठार

मारून आपण बंडखोराला मारल्याची शेखी मिरवीत. पण ठार झालेल्या इसमाला दाढी असल्याशिवाय तो बंडखोर होता यावर अधिकारी विश्वास ठेवीत नसत. त्यामुळे दाढीधाऱ्या बंडखोरांचे वेगळेपण हे एक प्रकारे स्थानिक जनतेला संरक्षणच झाले. त्यामुळेही फिडेलने बंडखोरांना दाढ्या वाढविण्यास उत्तेजन दिले. पुढे काही अमेरिकन वार्ताहरांनी फिडेल आणि त्याच्या गटांच्या हालचालींची सविस्तर माहिती टेलिव्हिजनवर दिली. तेव्हा बंडखोरांच्या विपुल केशसंभारामुळे त्यांना अमेरिकेत भलतीच रोमँटिक लोकप्रियता लाभली. क्रांतीच्या यशानंतर आपणही क्रांतीत भाग घेतला होता हे दाखविण्यासाठी सारेचे येरे-गबाळे दाढ्या वाढवू लागले होते. तेव्हा फिडेल कास्ट्रोला एक हुकूम काढून सिएरा मेस्त्राच्या चळवळीत भाग न घेणाऱ्यांवर दाढी वाढविण्यास बंदी घालावी लागली !

परंतु ही फार पुढची गोष्ट झाली. आपले कथासूत्र सुटले तेव्हा फिडेल आणि त्याचे क्रांतीकारक जिवंत असून आपली चळवळ जोरात चालवीत आहेत याची जगाला कल्पनाही नव्हती. बंडखोरांची परिस्थितीही मोठ्या हालाची होती. शहरा-मधील सव्वीस जुलै चळवळीशी संबंध प्रस्थापित झाला होता खरा. पण अद्याप शस्त्रास्त्रे मिळाली नव्हती. कुमकही आली नव्हती. 'ग्राम्मा 'मधून उतरून दोन महिने होऊन गेले होते.

## न्यूयॉर्क टाईम्सची मुलाखत

चळवळीची नीट आखणी करण्यासाठी फिडेलने फेब्रुवारी १९५७ च्या मध्याला सिएरा मेस्त्रामध्येच सव्वीस जुलैच्या निवडक कार्यकर्त्यांची बैठक घेण्याचे ठरविले. आपल्या हालचालींना प्रसिद्धी मिळाली पाहिजे हेही त्याच्या मनाने घेतले. कोण-त्याही एखाद्या चांगल्या अमेरिकन वार्ताहराला सिएरा मेस्त्रात गुपचूप धाडावे त्याची सर्व व्यवस्था होईल असा निरोपही त्याने हॅवानात धाडला.

फिडेल केव्हाच मेलेला आहे, अशा बातम्या प्रसृत झालेल्या असतानाही एकाही क्यूबन पत्रकाराने त्या वेळी सिएरा मेस्त्रात जाण्याची तयारी दाखविली नाही. त्याचवेळी न्यूयॉर्क टाईम्सचा एक वरिष्ठ वार्ताहर हर्बर्ट मॅथ्यूज आपल्या पत्नीसह सुटीवर म्हणून सहज हॅवानाला आला होता. त्याला जेव्हा हा निरोप मिळाला तेव्हा त्याने तात्काळ तयारी दर्शविली आणि अनेक लटपटी खटपटी करून आपली बायको आणि सव्वीस जुलैचे कार्यकर्ते यांच्यासह पोलीस आणि सैनिकी पहारे चुकवून सिएरा मेस्त्रात प्रवेश केला.

मॅथ्यूज फिडेलबरोबर दिवसभर होता. मुलाखत संपल्यावर तो गुपचूप हॅवानाला परतला आणि तेथून थेट न्यूयॉर्क. पुढील रविवारी फिडेलची मुलाखत न्यूयॉर्क टाईम्समध्ये छापून आली तेव्हा फिडेल क्यूबातच नव्हे तर सर्व अमेरिकेतही एकदम हिरो बनला. त्या वेळी फिडेलची परिस्थिती हलाखीची होती. तो जिवंत असल्याची पहिली बातमी मॅथ्यूजनेच दिली. त्या मुलाखतीने ताबडतोब फिडेल म्हणजे लॅटिन

अमेरिकेतील अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांचा एक प्रतीक बनला.

परंतु फिडेल मेलेला आहे याची बाटीस्टा सरकारला एवढी खात्री पटली होती, की मॅथ्यूजची मुलाखत म्हणजे काल्पनिक कादंबरीतील एक प्रकरणच आहे अशा तऱ्हेचे एक पत्रकच बाटीस्टाच्या संरक्षण मंत्र्याने काढले. दुसरे दिवशी न्यूयॉर्क टाईम्स्‌ने फिडेल आणि मॅथ्यूज यांचा एकत्र घेतलेला फोटो छापला तेव्हा हा मंत्री गप्प बसला.

याच सुमारास सव्वीस जुलैच्या निवडक कार्यकर्त्यांची बैठकही सिएरा मेस्त्रात संपली. शहरातून नवी कुमक पाठविण्याचे आश्वासन फ्रँक पेयस्‌ ने फिडेलला दिले.

अवस्था आणीबाणीची होती. 'ग्राम्मा'मधून आलेल्यापैकी बंडखोर आणि स्थानिक शेतकऱ्यांमधून येऊन मिळालेले असे सर्व मिळून बंडखोरांची संख्या दोन महिन्यानंतरही अठराच्यापुढे गेली नव्हती. अजून तर खूपच मोठा टप्पा गाठायचा होता.

[ क्रमशः ]

## पुस्तके... पृष्ठ ३५ वरून

म्हणून रोमांचकारी असते हे तर खरेच; पण त्यांचे वैयक्तिक, कौटुंबिक संबंध, पतिपत्नी, प्रेयसी-प्रियकर, माता-पुत्र, पिता-पुत्र म्हणून असणारे भावसंबंध यातून एक आगळेच नाट्य प्रगट होत असते. हे नाट्य टेम्सच्या लहरीत प्रभावीपणे व्यक्त झाले आहे; हेच तिचे कादंबरी म्हणून मोठे यश आहे.

कादंबरीत उणीव जाणवते ती प्रसंग फुलविण्याबाबत. काही वेळा लेखिकेची सूचकता योग्य वाटली तरी कित्येकदा ही त्रुटित शैली परिणामाच्या दृष्टीने थिटी वाटते. व्यक्तीच्या भावनाचे आवर्त रंगवितांना, स्मृतीचा आलेख दाखविताना पुष्कळदा पूर्वीच्या प्रसंगाची (मध्ये आडव्या रेघा टाकून) केवळ जंत्री दिली जाते ते कलाहीन वाटते.

तरीही पहिल्याच कादंबरीत परांडे यांनी अभिनव पार्श्वभूमी आणि विषय निवडण्याचे धाडस केले आहे आणि कादंबरीत सार्वकालिक मानवी भावनांची गुंफण करण्याचे उच्च दर्जाचे कौशल्य प्रगट केले आहे हे अभिनंदनीय आहे. ही कादंबरी त्यांच्या पुढच्या यशाची साथी ठरावी, अधिक कलापूर्ण कादंबऱ्यांची निर्मिती त्यांच्या हातून घडावी, अशीच कोणाचीही अपेक्षा असणार! ◻

**टेम्सच्या लाल लहरी** : उषा परांडे. प्रकाशक : श्रीहरी परांडे. संगमनेर. रु. १२–७५

 पृष्ठ २३ वरून

प्रमाणे पैसे जवळच्या पेटीत टाकायचे. अशा समंजस वातावरणात या उपक्रमाचा कुणी गैरफायदा घेईल असं मनातही येत नव्हतं.

महाविद्यालयीन शिक्षणक्रमास पूरक व्हावं अशा उद्देशानं व्यक्तिविकासाचा प्रयत्न म्हणून विद्यार्थी सहाय्यक समितीतर्फे प्रथमच हा वर्ग घेतला गेला. अल्प खर्चाची विद्यार्थिनींकडून अपेक्षा होती. उरलेल्या खर्चाचा भार इनव्हेस्मेंट इन मॅन ' या नवीन स्थापन झालेल्या ट्रस्टनं उचलला होता. वाटलं होतं की मुली एक महत्त्वाची जाणीव बरोबर घेऊन परतल्याचे त्यांच्या पालकांच्या ध्यानात आलं तर या वर्गाप्रीत्यर्थ झालेल्या खर्चांचा काही अधिक भार त्यांचे पालक स्वेच्छेनं उचलतील, पण ! जाऊ दे तो विषय झालं...

सांगायचं कारण या कार्यक्रमाच्या आखणीसाठी गेले दोन तीन महिने कार्य-कर्त्यांचे प्रयत्न चालू होते. आपण फार मोठं असं काहीतरी मुलींना देणार आहोत असा संयोजकांचा दावाच नसल्यामुळे भूमिका नम्र होती. वर्गाच्या उपयुक्ततेसंबंधी, स्वरूपासंबंधी विद्यार्थिनींकडून सतत प्रतिक्रिया विचारल्या जात होत्या. असे अभ्यासवर्ग वर्षातून दोन वेळेला घ्यावेत अशी प्रत्येकीची सूचना आहे. या व अशा प्रकारच्या सामान्यज्ञानाची आवश्यकता तीव्रतेने मुलींना जाणवते आहे. महाविद्यालयीन शिक्षणक्रमातच या उद्दिष्टांचा समावेश व्हायला हवा. अन्यथा ते शिक्षण फक्त पुस्तकीच होते आहे ही त्यांची खंत आहे.

शिक्षणक्रमात बदल मुंगीच्या पावलाने होतो आहे. तो सर्वांना लाभेल तेव्हा लाभेल. पण तोपर्यंत सामाजिक कार्यकर्त्यांनी, कार्यक्षम महिला मंडळांनी, गाव, तालुका व जिल्हा पातळीवर असे लहान मोठ्या मुदतीचे वर्ग घ्यायला हवेत. ते संपूर्णपणे यशस्वी करून दाखवावेत. या पाच पन्नास अनुभवांमधूनच नवीन पिढीच्या नेमक्या मागणीचा शोध लागेल अशी आशा वाटते. जळगावचे डॉ. आर. एन. आपटे, चाळीसगावचे प्राचार्य फाटक, व श्री. पूर्णपात्रे, वारणानगरच्या श्रीमती ठकार, ओझरच्या श्रीमती पटवर्धन, चिपळूणहून असंच कुणीसं, नासिकहून आणखी कोणीतरी या मंडळींनी आपापल्या गावी असे वर्ग घेण्याबाबत उत्सुकता दाखवली आहे. भरपूर परिश्रम, तरुणाचं सहकार्य या गोष्टी एक चैतन्य निर्माण करण्यास समर्थ आहेत. आज ना उद्या शिक्षणखाते या उपक्रमाची दखल घेईल असा विश्वास वाटतो.

समितीच्या या प्रथम प्रयोगाची दखल घेताना कोरेगावची कमल पत्रात लिहिते आहे, 'या वर्गामुळे माझ्यात खरोखरच फार बदल झाला आहे. माझं मन, डोळे अगदी विस्तृत झाले आहेत...'

**–सौ. निर्मला पुरंदरे**

# नंदिनी, आशा, उर्मिला, खुर्शिद....

पाऊस रिपरिपत असतो आणि एकुलत्या कंदिलांच्या क्षीण प्रकाशामुळं काळोख अधिकच गडद वाटत असतो. कंदील धरून पुढे चालत असलेल्या वाटाड्या-मागे आम्ही बारा-चौदा जण. सगळे प्रवासाने थकलेले. केव्हा एकदा झोपतो असं झालं असतं. अंधारामुळं किती अंतर अजून बाकी आहे हेही कळत नसतं. मधून-मधून चिखलात पाय जात असतात. त्यात अशोक भार्गव सांगत असतो–' कल तो साँप भी निकला था, दीमक भी काफी सक्रिय है. बडा मजा आनेवाला है. '

शेवटी फिकट प्रकाशात पांढुरके तंबू दिसायला लागतात. फलक दिसतो–भारतीय तरुण शांतीसेना शिबिर, कडोली. शाली-चादरी लपेटून आवारात उभे असलेले जुने मित्र अंधुक प्रकाशात ओळखतात. अरे केव्हा आले ? इतका वेळ कसा ? वगैरे प्रश्नांच्या फैरी झडतात. भरतभेटी होतात आणि क्षणात मनाची मरगळ दूर होते.

जेवण संपवून पुन्हा गप्पा सुरू होतात. ' अरे, यावेळेस इकडे पाऊस कसा ?' ' अरे आहे बाबा, आम्ही आल्यापासून मुळी तंबू उभारायचंच काम केलं. दोन–तीन वेळा वाऱ्यापावसात वाहून गेले. पुन्हा उभारले. ' मग तुमचं सांस्कृतिक शिबिर ? (शिबिरापूर्वी ३ दिवसाचं सांस्कृतिक शिबिर आयोजित केलेलं असतं–ह्याही एक अभिनव उपक्रम.) इतक्यात अशोक बंग म्हणून जातो–' अरे झोपू द्या त्यांना. सकाळी पाचला उठायचे आहे. पण खरं म्हणजे हे सांगण्याची गरजच नसते. गप्पा करता करता केव्हा झोप येते हे कळतच नाही.

सकाळी जाग येते जागरणगीतानं–' जो सोवत है वो खोवत है; जो जागत है वो पावत है ' उठून बाहेर येतो तर नुक्तच कुठं फटफटायला लागलं असतं. पाऊस थांबलेला असतो, पण थंड वारा झोंबत असतो. नजर जाईल तिथपर्यंत आंब्यांची डेरेदार, कैऱ्यांनी लगडलेली झाडं नजर जाईल तिथपर्यंत हिरवीगार सृष्टी. थंड काळोख वितळून धुक्यातले ओले डोंगर स्पष्ट व्हायला लागलेले असतात.

—सहजच तोंडातून उद्गार निघतात–' वा. काय मस्त स्पॉट आहे ! '

शिबिर चालवायची सगळी जबाबदारी तरुणांवर असते. मुख्य जबाबदारी दोघां-वर. अशोक भार्गव व अशोक बंग. शैक्षणिक यशानंतर लौकिक मार्ग सोडून आयुष्य क्रांतिकार्याकरता वाहून घेण्याची अफाट मानसिक ताकद आणि काम करण्याची क्षमता दोघात सारखीच आणि असे कित्येक साथी जमलेले असतात. आपल्या जगात अशी तरुण मुलंमुली असू शकतात याची जाणीव होते आणि स्वतःचं खुजे-

पण जाणवू लागतं. बिहारमधल्या सहर्सा जिल्ह्यात ग्रामस्वराज्य आंदोलनात काम करणारे साथी—शुभमूर्ती, किशोर शाह, अशोक वैराळे, जानकी दीदी. यातल्या किशोर शहाचं तर सारं पूर्वायुष्य गर्भश्रीमंतीत गेलेलं. सहजप्राप्त श्रीमंतीवर लाथ मारून या कामाकरता त्यानं आयुष्य फेकून दिलेलं. अशोक वैराळे हे सांगत असतो, तेव्हा मन साहजिकच गंभीर झालेलं असतं.

तरुण शांतीसेनेशी पूर्वीपासून संबंधित असलेले साथी असतात. गुजराथेतील मंदा दवे—ठेंगणी, अबोल, पण बोलते तेव्हा तिच्या विचारांचा परीघ विस्मयित करतो. गेल्या वर्षी इंदोर संमेलनाची ही अध्यक्ष होती. हिचा परिचय करून देताना नारायणभाई भावविवश झाले होते. हा भावनगरचा महेश भट्ट. गंभीर, अंतर्मुख. याने एकट्याने शिक्षणाचा नवा प्रयोग उभा केला पण तो कोसळला. हा बिहारचा लखनदीन. जयप्रकाशजी नक्षलवाद्यांचे आव्हान स्वीकारून मुशहरीत शिरले, तेव्हा त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन हा शिक्षण सोडून क्रांतीकार्यात पडला. शेवटच्या काही दिवसात याने वातावरणात वीज खेळवली. एक दिवस तो भोजन-घराच्या दाराशी थाळी घेऊन उभा राहिला. बाहेर येणाऱ्यांच्या पानातलं उष्टं घेऊन खायला लागला—उष्टं टाकण्याच्या सामंतवादी सवयीविरुद्ध अभिनव सत्याग्रह. आणखी काही मित्रांना त्याचं पाहून स्फूर्ती आली. एकदा-दोनदा-तिसऱ्यांदा ! सगळ्यांची पानं स्वच्छ.

क्रांतीकरता पागल झालेले अजून काही वेडे तिथे असतात. उत्तरप्रदेशाचा संतोष, मुझफरपूरची वंदना, महाराष्ट्राचे सुधाकर, किशोर, नरेश, दिनकर, बेळगावचा दिलीप कामत—त्याला तर क्षणाची उसंत नसते. शहाद्यातल्या आदिवासी संघर्षांत तीन महिने काम करून तो आला असतो. आता नव्या योजना डोक्यात आकार घेत असतात.

क्रांतीकारी तरुण-तरुणींचं हे एकत्रीकरण त्यांचा व्यक्तिशः आत्मविश्वास वाढवणारं असतं, दुसऱ्यांना स्फूर्ती देणारं असतं.

म्हणूनच शेवटी देशासाठी एक वर्ष द्यायचं तरुणांना आवाहन केलं जातं तेव्हा नऊजण पुढे येतात. नंदिनी भोसले, आशा भार्गव, उर्मिला मराठे, खुर्शीद बानू, राजीव पतके ही त्यातली काही नाव.

सांस्कृतिक शिबिराचा उद्देश पावसामुळं सफल होत नाही. पण बेळगावला एक भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केलेला असतो. तयारीला अपुरा वेळ असून, साधनांची कमतरता असून प्रभावी कार्यक्रम सादर केला जातो, त्याचं नाव ' भारत दर्शन '...पंजाबी भांगडा, आसामी बीहू, गुजराथी गरबा इत्यादी नृत्यं, नृत्यनाटिका, छायानाटिका, एकांकिका...

दररोज रात्रीचा सांस्कृतिक कार्यक्रमही असाच वैविध्यपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण !

आणि अशोक भार्गवचं भारतीय सांस्कृतिक क्रांतीगीत–ते सगळ्यांच्या वह्या–डायऱ्यात उतरवलं गेलं असतं–तंवूत, आवारात गुणगुणलं जात असतं.

अनेक कारणामुळं नियोजित वक्ते येऊ शकत नाहीत. त्यामुळं त्याच त्या वक्त्यांची भाषणं ऐकावी लागणं क्रमप्राप्तच असतं...मात्र विषय विविध असतात आणि भाषणंही दर्जेदार. नारायणभाई–अ. भा. शांतीसेनेचे मंत्री–अहिंसेवर बोलतात, क्रांतीवर, भूमिसमस्येवर देखील. विनोदानं स्वतःचा उल्लेख ते ' स्टॉक बोलर ' असा करतात. गांधी शांती प्रतिष्ठानचे सुब्बारावजी चंबळखोऱ्यात काम करून आलेले–ते तिथले थरारक अनुभव सांगतात. प्रा. पांढरीपांडे ' मॅन अँड मशीन ' व ' यूथ रिव्होल्ट ' वर बोलतात. त्यांच्या व्यासंगानं शिबिरार्थी प्रभावित होतात. यदुनाथजी थत्ते शिक्षणावर बोलतात.

उत्तर दुपारी चर्चा रंगतात––शिक्षणावर, भूमिसमस्येवर, भावी कार्यक्रमावर.

अशाच एका चर्चेतून कार्यक्रम निघतो. ६ ते ९ ऑगस्ट शहरात शिक्षणक्रांतीचा सघन प्रचार, शिक्षण पद्धतीची शवयात्रा–९ ते १५ ऑगस्ट खेड्यात पदयात्रा–ग्रामस्वावलंबनाचा प्रचार-असा ठाम कार्यक्रम.

प्रत्येक प्रांतातले शिबिरार्थी एकत्र जमतात. आपापल्या प्रांतात पुढे काय करावयाचं याचा खल करतात.

बौद्धिक बाबीइतकंच श्रमकार्याकडेही लक्ष पुरवण्यात येतं–दररोज सकाळी दोन तास श्रम. शिबिर असतंच कडोलीच्या ग्रामीण पार्श्वभूमीवर. शेजारच्या गावांना शिबिरार्थी भेट देतात. गावकऱ्यात मिसळतात.

शेवटी शिबिर संपतं. रात्र पडलेली असते. टिपूर चांदण्यात न्हालेली सतेज, ताजी रात्र, बहुतेक पौर्णिमाच एक-दोन दिवस इकडे तिकडे असतील. मग आम्ही निघतो बेळगावकडे–शेतातल्या पाऊलवाटांनी. केव्हा दोन तास संपतात आणि बेळगावचं जी. ए. हायस्कूल येत हे कळतही नाही. इथे राष्ट्रीय संमेलन असतं.

' आजादी की पचीस सालोंमें क्या खोया, क्या पाया ' हा संमेलनाचा केंद्र-विषय (थीम) असतो. विषयच मुळात आकर्षक. प्रतिनिधी राज्यतंत्र, अर्थरचना, शिक्षणपद्धती वगैरेवर चर्चा छेडतात.

उदघाटन करतात बंगला देशाचे शिक्षणतज्ज्ञ मी मीनूल रशीद. त्यांनी पाच तरुण शिबिरासाठी पूर्वीच पाठवले असतात. त्यांची सगळ्यांशी दोस्ती झालेलीच असते.

संमेलनानं पाडलेला एक नवा पायंडा म्हणजे संमेलनाला अध्यक्षच नसतो !

शेवटी जाण्याची वेळ येते, पण निघावसंच वाटत नसतं. पुन्हा रूटीन, नकली जगात जाणं बोअर होत असतं. पंधरा दिवस भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या दीडशे तरुण-तरुणीत राहून मनाचं तरुणपण तेजाळलं असतं.

चर्चांचे, गप्पांचे, गाण्यांचे.. सहजीवनाचे आणि सौहार्दाचे अनुभव मनाला घट्ट बिलगून बसले असतात.

तरुण शांतीसेना शिबिरातला हा नेहमीचा अनुभव. म्हणूनच ही शिबिरं ओढून नेतात.

या शिबिरातल्या अकारण स्नेह-सौहार्दातून एक शक्ती उभी राहतेय्. खऱ्या-खुऱ्या क्रांतीची असलेली तारुण्याची शक्ती. हिचा कुणाशीच विरोध नाही, कारण क्रांती सगळ्यांचीच गरज आहे...परिस्थितीचीही.

ही शक्ती धीमे वाढतच जाईल—माणसाला त्याच्या माणूसपणाचा शोध लागेपर्यंत.

**—पराग चोळकर**

---

## गोदीपूर : दिनांक १० जून ते १६ जून

---

भारतीय तरुण शांतीसेनेच्या महाराष्ट्र विभागाचे सातवे आंतरप्रदेशीय शिबिर गोदीपूर (ब्राह्मणपुरी) ह्या गावी घेण्यात आले. ह्या आंतर प्रांतीय शिबिरात कोल्हापूर, मुंबई, औरंगाबाद, जळगाव, वर्धा, नांदेड, नागपूर, अमरावती, बेळगाव (म्हैसूर) इ. जिल्ह्यातून अठ्ठावीस शिबिरार्थींनी भाग घेतला. हे शिबिर १० जून ते १६ जून ७२ पर्यंत चालले.

शिबिरात श्री. राजहंस, गोविंदराव शिंदे, पन्नालाल सुराणा, यदुनाथ थत्ते, गंगाप्रसाद आग्रवाल, अंबरसिंग इत्यादींची बौद्धिके झाली. येथील समस्येवर चर्चा व जनसंपर्क आयोजित करण्यात आला होता.

३५० लोकसंख्या असलेल्या या गावकऱ्यांच्या सहकार्यामुळेच शिबिर पार पडले. ऐनवेळी शाळेची जागा निवासासाठी नाकारल्यामुळे येथील प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री. शंकरराव पाटील यांनी आपले घर सर्व शिबिरार्थीसाठी मोकळे करून दिले. आणि आश्चर्य हे की, निवासासाठी नाकारलेली ही शाळा काही दिवसानंतर साध्या गणवेशात असलेल्या पोलीस मंडळींसाठी वापरण्यास मोकळी करून देण्यात आली होती. पाच-सहा पोलीस संपूर्ण दिवसभर सोबत होते. शिबिरातील सर्व गोष्टींची टाचणे ते दरवेळी घेत असत. दर तीन महिन्यास साठ रुपये मानधन मिळणाऱ्या पोलीसपाटलाचा मात्र यामुळे चांगलाच चुराडा झाला. दररोज पाच-सहा माणसे त्याच्याकडे असत. चहापाण्यापासून भोजनापर्यंतचा सर्वच भुर्दंड त्याला सोसावा लागला. स्वतःच्या भत्त्यातून एक पैसासुद्धा खर्च करण्याची सुबुद्धी बिचाऱ्यांना कशी सुचणार ?

शहाद्यास काही तरुण मंडळी मागील काही महिन्यापासून ठाण मांडून बसलेली आहेत. त्यांनी आपली उपकेंद्रे बनविलेली आहेत. त्या केंद्राभोवतीच्या परिसरात ते काम करीत असतात. त्यांचा या कामाचे अवलोकन करण्यासाठी शिबिराचे दोन गट दोन केंद्राच्या परिसरात या तरुण मित्रांसोबत फिरून आले. समस्येचे दर्शन अगदी जवळून झाले. यातील एक उद्बोधक प्रसंग असा की, आमची मंडळी दोन दिवस ३० मैलांचा पायी प्रवास आटोपून परत येत होती. चालावयाची सवय नाही. तशात एवढी मजल मारून आली. थकवा तर खूपच आला होता. एका नाल्याकाठी एक आदिवासी कुदळीने जमीन खोदत होता. पडीक जमीन होती ती. साधारण अर्धा एकराची. त्या जागेत शेती करावयाचे त्याने ठरविले. अधिकार कायदेशीर नव्हता.

तुरुंगात जावे लागले तरी बेहत्तर. पण ही जमीन कसावयाची असा निर्धार करून त्याने कुणाचीही परवानगी न घेता ती जमीन कसावयास सुरुवात केली होती. वक्कर, नांगर इ. साधनांच्या अभावी एकटयानेच कुदळीने खणावयास सुरुवात केली होती. हे दृश्य पाहून आधीच थकलेल्या आमच्या मंडळींना प्रेरणा झाली. त्यांनी गावातून साधने मागविली आणि खोदू लागले. त्याच्या जमिनीतील दगडे वेचून त्याचा बांध घातला. आमच्या या मदतीने त्याचे मनोधैर्य नक्कीच वाढले असेल. ती जमीन खोदून पूर्ण झाली. आता त्या जमिनीत पाऊस पडेल. तिथे हिरवे हिरवे पीक डोलू लागेल. त्या मजुराचे जमीनदाराकडे तोंड वेंगाडणे कमी होईल.

वृत्तपत्रातून माहिती वाचणे वेगळे आणि प्रत्यक्ष डोळयाने ती परिस्थिती पाहणे वेगळे. समस्येच्या भीषणतेचे दर्शन आम्हांस येथे आल्यामुळे झाले. डोळयावरच्या झापडी दूर झाल्याने काही जणांना येथे काम करण्याची प्रेरणा निर्माण झाली.

जरा अधिक बारकाईने पाहिल्यास केवळ शहाद्यातच ही परिस्थिती आहे आणि इतरत्र मात्र नाही असे नाही. येथे हे प्रमाण अधिक असू शकेल. जेथे कोठे तुम्ही आहात तेथेही भरपूर कामे आहेत हे जाणीवपूर्वक व सतर्कतेने पाहिल्यास दिसू शकेल. कुणीतरी पुढारी येईल आणि मग ही परिस्थिती पालटेल अशी अपेक्षा, असा विचार तरुणांनी करू नये असे विचार शिबिराचा समारोप करताना श्री. गंगाप्रसादजी अग्रवाल यांनी व्यक्त केले.

**–आत्माराम**

 पृष्ठ १९ वरून

शांतता प्रस्थापित झाली.

कामाने गळून गेलेला एक पोलीस अंमलदार तोंडावरला घाम पुसत मला म्हणाला, 'कॉमरेड, तुझ्यासारख्यांनी पोलीसदलात आलं पाहिजे. आम्हांला उपयोग होईल त्याचा.'

'ठीक आहे. विचार करतो.' मी हसून उत्तर दिलं.

नंतर मला स्टॅलीनच्या शवाचं दर्शन घ्यावंसंच वाटेना. लोकांच्या साखळ्या करून द्यायला मला उपयोगी पडलेल्या एका तरुणाबरोबर मी तिथून बाहेर पडलो. आम्ही मद्याची एक बाटली विकत घेतली नि घरी परतलो.

आईने विचारलं, 'काय रे, स्टॅलीनला पाहिलंस ?'

'हो तर.' मी निरुत्साहाने उत्तर दिलं. आम्ही ग्लासं भिडवली.

मी आईजवळ खोटं बोललो नव्हतो. मी जे पाहिलं होतं तेच स्टॅलीनचं खरं दर्शन होतं.

## २. कवीची भेट

पास्तरनाकची माझी पहिली भेट सत्तावन साली झाली.

त्याला भेटायला जाणारे तरुण कवी मलाही त्यांच्याबरोबर निघण्याला सांगायचे. पण मला वाटायचं, अशा गाठीभेटी अचानक दैवयोगानेच झालेल्या चांगल्या. मग एके दिवशी लेखक संघटनेने मला सांगितलं, की पास्तरनाकच्या भेटीसाठी निघालेल्या रिपेलीनो ह्या इटालीयन प्राध्यापकाची सोबत कर.

पूर्वसूचना न देता आम्ही गेलो.

करपलेल्या कांतीचा, पिकलेल्या केसांचा, पांढरे जाकीट घातलेला एक माणूस बागेच्या अगदी टोकाला एका झाडाच्या आडून प्रगट झाला; जणू माझ्यावर आदळलाच.

'कसं काय मंडळी ?' माझ्याशी हस्तांदोलन करताना त्याने हेल काढीत विचारलं. त्याच्या नजरेत आश्चर्य दाटलं होतं. असाही भाव होता, की ह्याला कशाचंच आश्चर्य म्हणून कसं ते वाटणार नाही. माझा हात न सोडताच तो हसत हसत म्हणाला,

"मी ओळखलंय तुम्हांला. तुम्ही येवतुशेन्को. मी जशी तुमच्याबद्दल कल्पना केली होती तसेच तुम्ही आहात. शिडशिडीत, उंच, लाजाळू वगैरे नसल्याचा बहाणा

करणारे. पण ते असो. मला तुमच्याबद्दल सारी काही माहिती आहे. तुम्ही साहित्य संघातल्या वर्गांना नियमीत येत नसता. वगैरे–वगैरे. तुमच्यासोबत आले आहेत ते जॉर्जीयाचे आहेत का ? मला जॉर्जीयन्स खूप आवडतात. ”

सोबतीचे गृहस्थ जॉर्जीयाचे कवी नसून इटालीयन प्रोफेसर आहेत अशी मी ओळख करून दिली.

‘ चांगलीच गोष्ट आहे. मला इटालीयन्समुद्धा आवडतात आणि बरं का, तुम्ही अगदी वेळेवर आलात बघा. जेवण तयारच आहे. चला, आपण आत जाऊ या. तुम्हाला भूक लागलेलीच असणार. ’

सगळा व्यवहार साधा नि सोपा झाला. आम्ही पंगतीला बसलो. कोंबड्या आणि ब्रॅन्डीचा समाचार घेतला.

पास्तरनाक सत्तेचाळीस अठ्ठेचाळीस वर्षांचे दिसतात. दवात भिजलेल्या फुलांच्या ताजेपणाने त्यांचे सारे व्यक्तिमत्त्व उजळलेले आहे. चटपट होणाऱ्या त्यांच्या हातांच्या हालचालींपासून थेट त्यांच्या चेहऱ्यावर फुलणाऱ्या बालसदृश्य स्मितापर्यंत, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश लहरींचा खेळ चालल्यासारखं वाटतं. जसं काही ते रंगभूमीवरच काम करताहेतसं वाटतं.

मेयरहोल्डला त्यांनी एकदा लिहिलं होतं, ‘ तुम्ही जी भूमिका करता तेच जर तुमचं सत्य असेल, तर तुम्ही तुमच्या भूमिकेत रंगून जा. ’ हाच आदेश त्यांनी स्वतःसाठीही मानला होता.

पास्तरनाकच्या काही ओळी मला आठवल्या.

What daring
To play for the centuries
As the gullies play
And as the river plays.

हास्याचा अभाव असलेल्या त्या कालखंडातही आपलं हास्य शाबूत ठेवायला त्यांना केवढं अध्यात्मिक बळ लागलं असणार.

हे बळच त्यांचं रक्षणकर्त ठरलं असणार.

तुमची पास्तरनाकबरोबरची प्रतिक्रिया तो एक व्यक्ती म्हणून होत नाही तर, ती एक रंग–सुगंध–ध्वनिविलास अशी होते.

त्याने खळखळून हसत सांगितलं.

‘ आज एक मजेशीर गोष्ट घडली. एक कौलं चाळणारा माझ्या माहितीतला कामगार मला भेटायला आला. आपल्या खिशातून मद्याची बाटली आणि सॉसेजीस काढून तो मला म्हणाला, परवा मी तुमच्या छताचं थोडसं काम केलं. तुम्ही कोण आहात वगैरे मला माहीत नव्हतं. आता काही चांगल्या मंडळींनी मला सांगितले आहे तुम्ही सत्याचे वाली आहात. तर मग त्यासाठी आपण आनंदोत्सव साजरा

केलाच पाहिजे. तेव्हा थोडसं पिऊया.' आम्ही प्यालो. नंतर तो मला म्हणाला, 'ठीक आहे. आता तुम्ही रस्ता दाखवा.' त्याला काय म्हणायचं आहे ते मला सुरुवातीला कळेना. मी विचारलं, 'कुठला रस्ता म्हणतोस?' त्यावर तो म्हणाला, 'तुम्ही सत्याचे वाली ना? तर मग मला सत्याचा मार्ग कोणता तो दाखवा.' आता तुम्ही हे जाणताच की मला कुणालाच कुठलंही मार्गदर्शन करायचं नसतं. कवी हा झाडासारखा असतो. झाड उभं असतं नि त्याची पानं सळसळत असतात. कुणालाही कुठंही घेऊन जायची त्याची अपेक्षाच नसते.'

आमच्याकडे तिरप्या नजरेने पाहात त्याने विचारलं,

'बोला, तुम्हांला काय वाटतं? मी म्हणतो तेच सत्य आहे की कवी हे सळसळणारं निरपेक्ष झाड असतं असं म्हणणं खोटं आहे?'

नंतर पास्तरनाकने आम्हांला आपल्या कविता स्वरांबरोबर माना वेळावीत वाचून दाखवल्या. त्याची बायको टेबलाशी चाळा करीत उभी होती. तिच्याकडे त्याने एक मिष्किल कटाक्ष टाकला. जणू आपल्यातलं तारुण्य जागं आहे ह्याचं त्याला भान होतं.

त्याने मला माझ्या काही कविता म्हणायला सांगितल्या.

मी Meddings ने सुरुवात केली. ती त्याला फारशी आवडली नाही. नंतर Prologne वाचली. ती आवडली. त्यातली एक ओळ त्याला इतकी आवडली, की त्याने लहान मुलासारख्या टाळ्या वाजवल्या आणि कविता वाचन संपल्यावर तर त्याने मला कवटाळलंच. मी मात्र नाउमेद होतो. कारण पास्तरनाकला ध्वनीसौंदर्य उमगत नसावं असं मला वाटलं. त्या दोन कवितांपैकी Prologne ही अधिक दिखाऊ आणि उथळ होती. नंतर माझ्या ध्यानात आलं की चूक माझीच होती. आम्ही पुन्हा एकदा भेटलो तेव्हा मी माझी Solitude वाचून दाखवली, तेव्हा तर त्याने रडायलाच सुरुवात केली. म्हणाला, 'ही कविता तू माझ्यावर—आणि इतर सर्वांवरच लिहिली आहेस.' पास्तरनाकला भावनावेगाचे असे झटके येत. त्याला Prologne आवडली होती. कारण त्या वेळची त्याची जी मनःस्थिती होती, त्या अवस्थेशी तिच्यातली भावना मिळती-जुळती होती. असणार.

पास्तरनाकशी माझ्या ज्या चार बैठका झाल्या त्याबद्दल मी पुढे कधीतरी लिहीन. शेवटच्या निरोपाच्या वेळी त्याने माझा रशियातल्या रीतीप्रमाणे कडकडून मुका घेतला.

त्याच्या ओठावर पुष्पगंध होता.

◻ ◻ ◻

 पृष्ठ ९ वरून

काय शिल्लक राहिले आहे ह्या विद्यापीठात ?

प्राध्यापक : त्यांची प्रतिष्ठा ? त्यांचे ज्ञान ? त्यांची लाज ?

विद्यार्थी : त्याचे श्रम ? जिज्ञासा ? बुद्धी ? तारुण्य ?

आता जमाना आलाय शब्दांचा; आशय केव्हाच संपून गेले आहेत.

शब्द आणि आशय, कल्पना आणि सत्यस्थिती ह्यातल्या दरीकडे बोट दाखवण्याचा खटाटोप कोणाला तरी करावाच लागेल.

विद्यापीठांनी आता सरळ पैसे घेऊन डिग्रचा विकण्याची दुकाने काढावीत, शिक्षणाच्या गोंडस नावाखाली कॉलेज, प्राध्यापक, शिक्षणक्रम, परीक्षा हे सर्व चाललेले खेळ बंद करावेत. समाजातल्या मातबरांचा, विद्यार्थ्यांचा अनुनय प्रामाणिकपणे करायचा असेल तर खिसे कापणे, टॅक्स चुकवणे, मारामाऱ्या करणे, दंगे करणे आदी कसबांचे डिप्लोमा देणे सुरू करावे.

कॉपी करणे यासारख्या भयानक प्रकारावर काही बोलायचीही हिंमत कोणाला राहिलेली नाही. कृती दूरच. प्राध्यापक लाचार झाले आहेत. काही सन्माननीय अपवाद वगळता प्राध्यापकांचा आणि व्यासंगाचा संबंध तुटला आहे. प्राध्यापकांना आता ज्ञान (नॉलेज) नको, माहिती (इन्फर्मेशन) हवी आहे. त्यांची धडपड आता केवळ जगण्यासाठी व होता होईतो प्रतिष्ठेची झूल टिकवून पोट भरण्यासाठी आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला रोखण्याचे नैतिक धैर्य त्यांच्यात नाही. कणखरपणा टिकावा कसा ? शिक्षणाचा ज्यांचा संबंध नाही, काढलेल्या कॉलेजेसच्या संख्येवरून कर्मवीरपदे पटकावणारे आणि आमदारकीसाठी रांग लावणारे पुढारी ह्यांच्या कॉलेजांचे मालक आणि चालक ! ह्या पुढाऱ्यांची बदलणारी मर्जी सांभाळायची कसरत करण्यातच प्राध्यापकांची शक्ती खर्च होते. जमेला जयंत्या, १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला 'लोकांनला' कधी न ऐकलेले चार शब्द ऐकवणे आणि निवडणुकीत पाठिंब्यांच्या प्रचार पत्रकावर सह्या करणे हाच आता त्यांचा खरा उद्योग राहिला आहे. कुठे उरलाय वेळ त्यांना मूल्यांची जपणूक करायला ?

विद्यार्थ्यांना काय म्हणावे ? ते तर उद्याचेच नव्हे, आजच्याच देशाचे आधारस्तंभ झाले आहेत. राजकीय पक्ष, जातीय संस्थांचा हा कच्चा माल, ही भूमिका ते हिरीरीने पार पाडताना दिसतात ! मोठ्यांप्रमाणे त्यांनीही त्यांचे 'आंदोलन, उद्रेक, प्रस्थापित बंड' हे परवलीचे शब्द तयार केलेलेच आहेत. कुठेही विद्यार्थ्यांच्यात गडबड दिसली की काही विचार न करता 'आंदोलनाला नेतृत्व देणारे' धंदेवाईक युवक नेतेही आता मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. प्राध्यापकांची आणि समाजाची एकंदर मूल्यात्मक दिवाळखोरी ही पार्श्वभूमी तयार आहेच.

एवढा सगळा मालमसाला तयार असताना विचार करण्याची आवश्यकता त्यांना उरतच नाही. कॉपी करणार नाही, नापास झालो तरी चालेल, ही हिंमत त्यांच्यात उरायचे कारण नाही. आपला कल असेल त्या बाजूचे शिक्षण घ्यावे, हा विचार त्याला शिवत नाही. कारण तोही भ्रष्ट झाला आहे. खेळात, कलेत, संगीतात, गिर्यारोहणात तो रमायला तयार होत नाही. राजेश खन्नाचा आदेश बाळगूनही राजा एडवर्डसारखे प्रेम करायची रगही त्याच्यात शिल्लक राहिलेली नाही. प्रेम केलेली मुलगी दुसऱ्या जातीची किंवा धर्माची निघाली की तो खिन्न होतो. त्याच्याच जातीची निघाली तर हुडा मिळाला नाही म्हणून 'तू मला विसरून जा' वगैरे फिल्मी संवाद मात्र त्याला झटकन आठवतात.

अशी त्याची परिस्थिती ! मग आधीच हे शिक्षण भ्रष्ट आहे. भाकरी देण्याच्या लायकीचे नाही, गुणात्मक दृष्टया निकस आहे; कॉपीचे प्रकार सर्रास चालतात; अशा मराठवाडा विद्यापीठातच परभणीला कॉलेज आणण्यात काय शहाणपण ! त्यापेक्षा व्यापक शैक्षणिक प्रश्नांवरच खरे आंदोलन करायला पाहिजे ह्याचा विचार तो करत नाही. मराठवाडयाचा व विदर्भाचा विकास फार महत्त्वाचा आहे ह्याची जाणीव त्याला राहत नाही. नागपुरातली विदर्भ विकास परिषद त्यामुळे त्याच्या टिंगलीचा विषय बनते. परभणीत प्रचंड आंदोलन झाले. त्यात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे गावात दर उगवत्या सूर्यासमोर होणारे अत्याचार निमूटपणे तो सहन करतो हा तर नित्याचाच अनुभव.

तरीही त्यांची प्रखर आंदोलने होताहेत. महत्त्वाचे प्रश्न कायम बाजूला. नको त्या प्रश्नांवर, खोटया, चुकीच्या चळवळी उभ्या राहात आहेत. त्यांना पाठिंबा मिळतो आहे. काही विचार करून मागणाऱ्यांना 'तुम्ही जैसे थे वादी आहात' अशी शिवी हासडली जाते.

सुसंस्कृत घराण्यातल्या एका प्राध्यापकाच्या मुलीने परवाच्या मॅट्रिकच्या परीक्षेत कॉपी केली. पकडली गेली. ती मुलगी रडली नाही, तिने सोडा म्हणून गयावयाही केले नाही. घरी आल्यावर तिला पश्चात्तापही झाल्यासारखे वाटले नाही. तिला मुळी काही झाले असे वाटलेच नाही. वर्गात जायचे, त्यानंतर घंटा वाजते, पर्यवेक्षक येतात, पेपर वाटतात. ह्या परीक्षा खोलीतल्या घटनांपैकी कंपासपेटीतून घरून लिहून आणलेले कागद आणायचे, त्यात बघून पेपरच्या प्रश्नांना उत्तरे लिहायची ह्याही आवश्यक, सवयीच्या घटनाच आहेत. त्यात विशेष असे काहीच नाही. त्यात कसला आलाय गुन्हा ? ती तर प्रतिक्षिप्त क्रियाच आहे.

ही आहे उद्याच्या दिवसाची सुरुवात ! वादळाची नांदी !

डोळे उघडे ठेवून झोपायची संवय समाजाला लागली, कान उघडे ठेवून बहिरे होण्याची कला समाजाला जमली की मग ह्यापेक्षा वेगळे काय घडणार !

□ □ □

# मध्यंतर

## देह देवाचे मंदिर

### ....अशा वेळी कोणीच कोणाला सावरू शकत नाही

**पुष्पा भावे**

मुंबईच्या नाट्यवर्तुळात, एके काळी ' आय. एन. टी. 'चे नवे नाटक याला काही विशेष अर्थ होता. परंतु गेली काही वर्षे मराठीच्या संदर्भात आय. एन. टी.ला फारसा अर्थ उरलेला नाही. नाही म्हणायला गेल्या वर्षी मात्र ' हवा अंधारा कवडसा ' हे श्री. शं. ना. नवरे यांचे गंभीर नाटक आय. एन. टी. च्या वतीने रंगभूमीवर आणण्याचे धाडस श्री. दुभाषी यांनी केले होते. श्री. सतीश दुभाषी यांच्याकडे मराठी नाट्यनिर्मितीची सूत्रे आय. एन. टी. ने दिली असल्याची वार्ताही त्याच वेळी ऐकली होती. श्री. सतीश दुभाषी यांनी प्रारंभी ' रंगायन 'च्या नाटकात काम केले होते हे खरे असले तरी त्यांची मराठी रंगभूमीवरील गेल्या काही वर्षांची कारकीर्द व्यावसायिक स्वरूपाची आहे. ' हा खेळ सावल्यांचा ' या आकांक्षी नाटकाचा अपवाद वजा करता चिरकाल स्मरणात राहील अशी भूमिका त्यांना मिळाली नाही. ' मेजर चंद्रकांत 'पासून ' सूर राहू दे ' या नाटकापर्यंत ज्या भूमिका त्यांच्या वाट्याला आल्या त्या त्यांच्या अभिनयाचा व शब्दोच्चारणाचा एक साचा बनविणाऱ्या होत्या. त्यामुळे माझ्यासारख्या ज्या अनेक प्रेक्षकांना त्यांच्या संयत अभिनयाविषयी आस्था होती, त्यांना श्री. दुभाषी यांच्या अभिनयशक्तीचा नेमका अंदाज लागत नव्हता. श्री. दुभाषी यांना, स्वत: नाटके निवडून ती दिग्दर्शित करण्याची संधी मिळणार असे कळले तेव्हा त्यांनी आय. एन. टी. तर्फे केलेल्या नाटकांविषयी नवे कुतूहल जागे झाले. परंतु त्यांनी श्री. गोवईकर यांचे ' देह देवाचे मंदिर ' हे नाटक का निवडले हे मात्र उमगले नाही. ज्या नाटकामध्ये ना प्रायोगिक स्वरूपाचा आकांक्षी यत्न ना व्यावसायिक यशाची शक्यता, असे नाटक श्री. दुभाषी आय. एन. टी. तर्फे करतात हे आश्चर्यच आहे. प्रस्तुत नाटक पापपुण्याच्या सनातन

प्रश्नावर आधारलेले आहे. आपल्याला पुत्र नाही या कल्पनेने ज्याचे जीवन कडवट झाले आहे. अशा पतीला सुख लाभावे या हेतूने त्याची पत्नी व्यभिचार करते. तो व्यभिचार नाही, आमचाच गर्भ आहे, असे सांगत राहते. परंतु पतीला खरी गोष्ट कळताच तो तिचा स्वीकार करू शकत नाही. ती आत्मघाताचा यत्न करते–शेवटी पती तिचा व मुलाचा स्वीकार करतो. आकांक्षी होऊ शकली असती अशी ही कथावस्तू (श्री. गोवईकरांनी 'बहुरूपी'चे 'अपत्य' [ले. श्री. कमलाकर नाडकर्णी] हे नाटक पाहिले नसेलच.) आहे. परंतु लेखकाने सुभाषितांचे संवाद, आकारविहीन अंकरचना आणि मनोविश्लेषणाचा केविलवाणा प्रयत्न यांच्या आधारे कथावस्तूचा अपमान केला आहे. अवघी चार पात्रे असणाऱ्या नाटकातले एक पात्र लेखकाच्या सोयीसाठी आलेले–मराठी नाट्यरसिकांना ओळखीचे वाटणारे, सर्व प्रसंगी उपस्थित असणाऱ्या मित्राचे पात्र! दुसरे विठ्ठलचे : त्या पात्राचे नाट्यवस्तूशी असणारे संबंध नाटककाराने जबाबदारीने योजलेले नाहीत. त्यात ती भूमिका श्री. पृथ्वीराज शिंदे नामे एका नटाने केली आहे–ती अशी की हे पात्र रंगमंचावर येताच गंभीर प्रसंगी हसू फुटावे. श्री. दुभाषी यांनी वेगळे, वयस्कर व्यक्तिमत्त्व धारण करण्याचा यत्न केला; पण तोही फसला. त्यांच्या संयत अनुभवाचा तोलही या नाटकात ढळला. नायिकेची भूमिका, समजून करावयाची तर, अतिशय अवघड होती. ही भूमिका भावना (सौ. ताटे) या अभिनेत्रीने केली. डॉ. लागूंसारख्या नटासमवेत रंगमंचावर वावरूनही या नटीला भूमिकेला व्यक्तिमत्त्व देणे कधी साधत नाही. गोड आवाज, तिरपी मान, अटकर बांधा एवढेच भांडवल...अर्थात या नाटकाला ते पुरेसे होते. अशा नाटकाविषयी काय लिहावे? एका गंभीर प्रसंगी विठ्ठल नायिकेला सांगतो, थंडीपुरता स्वेटर घे आणि नीघ'–याच वाक्याचा चार वेळा उच्चार होतो. एका बाजूला कृतक काव्यात्म संवाद आणि दुसऱ्या बाजूला शब्दाच्या वजनाची जाणही नसलेले संवाद. एवढेही पुरले नव्हते म्हणून की काय नायकाच्या अपत्यहीनत्वाचे दुःख व्यक्त करणारा एक महत्त्वाचा संवाद शब्दशः श्री. जी. ए. कुलकर्णी यांच्या 'स्लीला' या कथेतील आहे. (पाहा : 'हिरवे रावे', पृ. १५०) अशा ओळखीच्या खुणा श्री. गोवईकरांच्या लिखाणात जागोजाग आढळतात.

हे नाटक इतके कच्चे आहे, की त्यातील अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शन याविषयी कसे आणि काय लिहायचे? एक मात्र खरे की 'देह देवाचे मंदिर' सारखे एकीकडे बाळ कोल्हटकरी पद्धतीचे संवाद व दुसरीकडे आधुनिक भासणारी कथावस्तू या दोन्ही दरडींवर पाय ठेवणारे नाटक कोसळते त्या वेळी कोणीच त्याला सावरू शकत नाही. असे नाटक दिग्दर्शक, नट, संस्था यांना समवेत घेऊनच कोसळते. त्यामुळे श्री. दुभाषींनी यापुढील निवड अधिक कसोशीने करावी; मराठी प्रेक्षकांच्या समंजस सोशिकतेचा अंत पाहू नये अशी नम्र सूचना!

□ □ □

पृष्ठ ७ वरून

जोरदार आहे, की हा सारा आवेश त्याचा प्रत्यय आहे.' पुढं ती आपल्या सासर माहेराचं वर्णन करू लागली. माझे तिकडे लक्षच नव्हतं. तिच्या लग्नदिवशीचा सगळा प्रसंग माझ्या डोळ्यापुढे उभा राहिला.

माझ्या सासूबाई खूप शांत, प्रेमळ,! नव्यांचं सर्वच वागणं पटलं नाही तरी त्यांच्या सुखात सुख पाहणाऱ्या आणि त्या वेळी तरी 'सेवादलाची पिशवी काखोटीला अडकवून गावोगांव भटकणारा आपला वासू या नव्या बंधानं बांधला जातो आहे' याच समाधानात होत्या. त्यामुळं नव्या सुनेला आशीर्वाद द्यायला त्या माझ्या आधी पुण्यास पोचल्या. पण खरा गहजब केला माझ्या चुलत सासूबाईंनी. त्यांना मूलबाळ नव्हते आणि जावेची ही सारी मुले त्यांनी आपली म्हणून वाढवली होती. त्यातून वासू त्यांचा फार लाडका. माहेरी गेल्या तरी त्याला बरोबर नेत. कधीकधी नेण्याचे जमले नाही तर निदान आपल्या पातळाची चौघडी पांघरायला ठेवीत. शेवटी वासूनेच पाणी पाजावे ही नकळत जोपासलेली दृढभावना, त्यामुळे त्यांचा या लग्नाचे वेळी तोलच गेला. आम्ही पुण्यास निघालो तर त्या शेजारच्या देवळात जाऊन बसल्या. तिथे सांगायला गेले तर आपण आता कधीच घरी येणार नसल्याचे व त्या घरात पाणीसुद्धा पिणार नसल्याचे त्यांनी मला बजावले. थोडी मनाविरूद्ध गोष्ट झाली तरी आग पाखडण्याचा त्यांचा स्वभाव मी अनुभवीत होते, पण त्या दिवशीचे त्यांचे रौद्ररूप भयभीत करणारेच होते. काय करावे मला समजेना. मी तशीच टांग्यात जाऊन बसले. घरावर त्यांचे एवढे प्रेम, की माझी पाठ वळताच त्या घरी आल्याशिवाय राहणार नाहीत याबद्दल माझी खात्री होती. पण या लग्नाने आमच्या घरात जुन्या नव्यांचे कायम तट पडणार की काय या शंकेने मी व्याकूळ झाले. कारण आजवरचा जावानणंदांच्या आणि दीर-भावांच्या माझ्या गोकुळातला आनंद दृष्ट लागण्याजोगाच होता. पण ही खडीसाखर आमच्या या दूधसागरात केव्हा आणि कशी विरघळली समजलेच नाही. दसऱ्याला माझ्या सासऱ्यांचे श्राद्ध असे. कौटुंबिक स्नेहसंमेलनच ते. त्या आमच्या स्नेहसंमेलनास आवाबेन आली तर याच माझ्या चुलतसासूबाई तिला कुठे ठेवू अन् कुठे नको करू लागल्या. 'अवंतिका, अवंतिका' (त्यांनी केलेलं हे तिचं खास नामरूपांतर) म्हणत माझ्या बद्दलच्या तक्रारी तिच्याकडे सांगण्याइतका विश्वास तिने मिळविला. सगळ्या सुनात ती लाडकी ठरली. हा साराच चमत्कार तिच्या साक्षेपी वागण्याने घडला. मोठ्या मनानं त्यांचे संस्कार तिने समजून घेतलेन आणि आपला निर्मळ हात त्यांच्या सोवळ्याला लागणार नाही याबद्दल ती दक्ष राहिली. या कामी माझ्या तिघी वन्संचे सहाय्य मोठेच आहे. त्या जुन्या

संस्कारात वाढलेल्या असल्या तरी मनाने उमद्या आहेत. नवं समजावून घेण्याची ताकद त्यांच्याजवळ आहे. त्या कधीकधी रहिमतपूरला येत तेव्हा आवाबेन किती आतिथ्यशील आहे, रात्रंदिवस लोकांच्या सुखासाठी कशी धावपळ करते हे सांगत. भावाइतकीच समर्थ भावजय म्हणजे केवढा आधार वाटे त्यांना आणि रहिमतपूर-सारखंच पुण्यातलं आवाबेनचं घरही आपल्या मुलीचं माहेर आहे, हे बाईनी जाणलं. आपल्या सहजशुद्ध प्रेमानं आवाबेनने मुळी विरोधकांची आयुधच अशी निकामी करून टाकली. माझ्या थोरल्या वन्सं तिला 'विमल' म्हणत. आपलं सहज सुलभ म्हणून. पण स्फटिकासारख्या अंतर्बाह्य विमलतेस तेही शोभून दिसलं.

## धडपडण हा धर्मच

आणि आता एकदम तिच्या शेवटच्या आजारातलेच दिवस आठवतात. जणू गेल्या वीस बावीस वर्षांत आम्ही कधी भेटलो नव्हतो. बोललो नव्हतो इतकं परवाच्या वीस-बावीस दिवसांत बोललो. पण तसं म्हणाल तर निवांतपणे संसारातील सुखदुःखाच्या गोष्टी करायला तिला कधीच उसंत नसे. केव्हा यावं तेव्हा ती एखाद्या मिटिंगला गेलेली असे नाहीतर कोणत्यातरी गावाहून दमून भागून आलेली असे आणि म्हणे, 'आताशा ही कामं इतकी वाढली-आहेत, की क्षणाची फुरसतही भेटत नाही.' मी मनाशी हसे. कारण गेली वीस वर्षे ती हेच म्हणत होती आणि दर दिवशी नवे व्याप वाढवीत होती. आग्रहीपणाने आपल्या सहकाऱ्यांना कामाला जुंपत होती. इरेस पेटून जिवापाड धडपडणे हा तिचा धर्म असल्याने इतरांचा थंडपणा तिला असा काही झोंबे, विचारू नका. घरीदारी तिचा कडकडाट सुरू होई. पण हे सारे श्वासोश्वासाइतके रोजचे आणि सहज कारण हेच तिचे जगणे होते. आज काय रविन्द्रपुण्यस्मरण, उद्या आंतरभारती संमेलन, परवा फ्रेंच पाहुण्यांचे स्वागत तर तेरवा समाजवादी महिला सभेचं अधिवेशन. सेवादल आणि कलापथक यांना तर तिनं वाहून घेतलेलं. कुटुंबनियोजनाचे प्रचार–दौरे रात्रंदिवस चालू. त्या दिवसात तुम्ही कधी तिच्या घरात डोकावले असते तर मोहऱ्या तडतडत आहेत, फोन खणखणत आहे आणि लाह्या फुटाव्या तशा आवाजात आणि गतीने आवाबेन सर्वांवर नियंत्रण ठेवीत आहे, असे दिसले असते. हाताने अलकाचा डबा तयार करीत असता बडोद्यास कोणी जाणार असल्याचा वेध घेऊन माणिक ज्योतीसाठी ती काही पाठविणार असेल. अरुणा यायची आहे हे लक्षात ठेवून चैतुसाठी द्राक्षे आणून ठेवेल आणि अवेळी कोणी डॉक्टरना सतवायला आला तर त्याला दमही भरेल. इतका अष्टावधानीपणा पाहून तुम्ही चकित न व्हाल तरच नवल. या साऱ्या गदारोळात केव्हाची तडतडणारी फोडणी करपली असेल असं तुम्हांला वाटेल पण नाही. या साऱ्या गडबडीत त्यात भाजी टाकलेली असेल. श्रावणातल्या हलक्या-फुलक्या सरींचा शिडकावा चालू आहेना सारखा. वासुभाऊ घरात आलेले आहेत तेव्हा देखील उन-पावसाची गंमत लुटताना आपण त्यांच्या घरी किती वेळ रेंगाळलो

याचे तुम्हाला भान असणार नाही. अशा वेळी आवाबेन आंब्याच्या फोडी करेल, बटाट्याचे काप तळेल पण ते ठेवेलसुद्धा इतक्या कलात्मक रीतीने की त्याची आरास कशी मोडावी याचा खाणाराला प्रश्न पडावा.

मोठ्या कामात निमग्न असली तरी लोकांच्या छोट्या सुखसोयींकडे तिचे दुर्लक्ष होत नसे. ६४ साली रहिमतपूरला लिपीजलूप शिबिर आमच्या घरी झाले. डॉक्टरांच्या निवासापासून ऑपरेशन थिएटरपर्यंत सर्व आमच्या घरात—दवाखान्यातच सज्ज झालेले. मला वाटले आता हिच्या मनासारखे सर्व जमले बरं का ? कारण दोन दिवस आधी येऊन सी. ओ. पासून ए. ओ. पर्यंत सर्वांना हलविण्याचे काम अव्याहत चालू होते. पण नाही. आपल्या दृष्टीने एक बारीकशी पण तिच्या दृष्टीने मोठीच उणीव राहिली. येणाऱ्या स्त्रियांची मुले आम्हांना सोडून कशी राहतील याची तिला चिंता पडली. झाले. ऑपरेशन थिएटरच्या समोरच्याच छोट्या खोलीत एक दिवसाची अभिनव बालवाडी सुरू झाली. बालवाडीच्या बाईंना तर ती मुले संभाळण्याचे काम दिवसभर पुरवलेच पण उगाच इकडे तिकडे करणाऱ्या आमच्या मंडळाच्या बायकांच्या कडेवरही तिने एकेक बोचके बसवले.

## अजोड साथ

तिच्या अंगभूत गुणांनी ती असामान्य होती. यात शंकाच नाही. पण तिला अधिक थोर करण्यात माझ्या भावोजींचा वाटाही मोठा आहे. दोघेही ध्येयवेडी असली तरी स्वप्नाळू असून चालत नाहीत. आपली ध्येये साकार करण्यासाठीच कुणाला तरी व्यवहाराच्या पातळीवर उतरावे लागते, व्यवसाय करावा लागतो व तो यशस्वी करण्यासाठी अपार श्रमही पडतात. संसाराची बाजू तर त्यांनी लीलतेने पेललीच पण तिच्यां सार्वजनिक जीवनात त्यांनी जी साथ दिली ती अजोडच म्हणावी लागेल. कितीही मोठ्या मनाचा सुजाण पुरुष असला तरी त्याच्यात नवरेगिरी नसते असे क्वचितच घडते. पण ते आधी तिचे सुहृद आहेत आणि विनोद हा त्यांचा सखा आहे. सदैव बरसणाऱ्या हास्याच्या त्या प्रकाशरेखांनीच जीवनातील सर्व झुंजी खेळण्याचं आणि दुराध्य रोगाशी झगडण्याचं सामर्थ्य तिला दिलं आहे. आणि ते अखेरचे दिवस आले. आमच्यात कधी वाद-संवाद झालेच नसतील, मी तिचं काही बोलून घेतलंच नसेल, अशा नव्या जिव्हाळ्यानं आम्ही बोलत असू. त्यात नव्या घराची सुंदर प्रतिमा होती, मुलांच्या भावी जीवनाची स्वप्ने होती आणखीही बरेच काही होते की जे शब्दरूप होत नसे. जडलेली व्याधी कितीही भीषण असली तरी ती निराश झाली नव्हती. काया शुष्क होत चालली तरी संसारी आणि सामाजिक जीवनातला रस आटला नाही. एखादे दिवशी जुन्या नव्या कपड्यांची गाठोडी उलगडून अलकाचे उन्हाळी कपडे निराळे ठेवायला सांगे तर आज सुभाषचा वाढदिवस तेव्हा एवढा शिरा तरी कर म्हणे. आता हा सुभाष कोण हा तुम्हाला प्रश्न आणि विचार करू लागले म्हणजे मलाही न सुटलेले कोडे !

परमेश्वराच्या अस्तित्वावर काही माझ्या भावोजींचा विश्वास नाही पण नाथा घरी चंदन घासणाऱ्या कृष्ण सख्याचीच आठवण व्हावी असा आमच्या संकटकाळी धाऊन आलेला आमच्या दिलीपचाच नव्हे तर घरादाराचा सखा ! पूर्वजन्मीचे धागेदोरे अज्ञात असतात, पण या जन्मीचा आवाबेनचा मानसपुत्र ! ज्याला आपलं म्हटलं त्याच्यावर जीवापाड प्रेम करण्यात तो आवाबेनलाही हार जाणारा नसल्यानं दोघांनी एकमेकांना जिंकलेलं !

आणि परवाचा तो अखेरचा संवाद ! गात्रे क्षीण झालेली, आवाज उमटत नव्हता पण सुंदर विचार ऐकण्याची मनाची तळमळ शमली नव्हती. मला म्हणाली, 'आपण कोणती प्रार्थना म्हणत होतो ती म्हण' 'ईशावास्यमिदंसर्वम...' प्रेमाबाई सांगत होत्या आणि आम्ही उपचार म्हणून म्हणत होतो तीस वर्षांपूर्वी. पण आता ते शब्द आपोआप उमटू लागले. पण खरं सांगू ? दुःखाचे कढ आतल्या आत गिळत 'सर्वेपि सुखीनः संतु सर्वेसंतु निरामया' मला म्हणवेना. पुढचं आठवेना. मनाच्या समाधानासाठी मी पसायदान मागितलं, 'ज्ञान हेच परमेश्वर स्वरूप आहे' असेही तिला ऐकवलं, मधून सुंदर अभंग म्हटला पण प्रार्थनेतील काही श्लोक विसरल्याची चुटपुट आजही मनाला लागली आहे. आता वाटतं विसरले कसली ! ती अहोरात्र तत्त्वज्ञान जगत असल्याने मायामोहाचे पाश तुटण्याच्या क्षणी देखील गीता एकाग्र होऊन ऐकण्याचे सामर्थ्य तिचे ! पण रणांगण समोर दिसू लागताच विकलांग होणाऱ्या अर्जुनाचे वंशज आपण, आपली ही अशी बोबडी वळायचीच.

अखेर तो झगडा संपला. कुणी कुणावर विजय मिळवला हे सांगणं कठीण आहे. पण तेज तेजाला मिळालं. माती मातीला मिळाली. असं म्हणतात 'वीज जिथे कोसळते तिथली भूमी अधिक सुपीक होते' सारा दाह पोटात शमवून ती माती नव्या तेजाला जन्म देते. आवा, तुझा अनुग्रह आमच्या कुटुंबावर झाला. तुझे तेज पिऊन नवे अंकूर उमटतील म्हणून वाट पहातेस ना ?

□ □ □

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबावतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

व्यावहारिकदृष्टचा सामान्यात जमा होणारे हे चरित्र. पण या सामान्याने एका विशाल उद्दिष्टाच्या रथाशी स्वतःला बांधून घेतले आणि रस्त्यावरच्या दगडधोंड्यांनी शरीर व मन घायाळ होत असतांही कधी सुखाचा निवारा शोधला नाही. जखमी होऊनही पराभूत न झालेल्या, प्रसादाच्या अपेक्षेवाचून पूजा करणाऱ्या, उजेडाच्या उपासनेसाठी काळोख विकत घेणाऱ्या माणसाची, एका विठू मास्तराची ही कहाणी. त्या कार्यकर्त्याच्या शब्दात थोडा बदल करून मी शेवटी म्हणेन, 'लाँग लिव्ह विठू मास्तर!'

—कुसुमाग्रज


# कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके

दहा रुपये

राजहंस प्रकाशन

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649



" ह्या खरं म्हणजे मूळ मंत्र्यांसाठी बांधलेल्या फ्लॅटमधील हॉल. पण
नंतर समाजवाद त्वरित आणावा म्हणून ही सुधारणा करून या जागेत
कामगारांसाठी रहाण्याची सोय करण्यात आलीय्...."